www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118




दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ




अधिक माहिती - पान ३

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | वर्ष - ०२ | अंक ११२ | पृष्ठे - ०६ | ठाणे, बुधवार, ११ सप्टेंबर २०२४ | रु. २/- | RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# राजकीय फलकबाजी

## गणेशोत्सव काळात न्यायालयाच्या आदेशांचा विसर

● मुंबई, विशाल कारंडे :

सध्या राज्यासह मुंबईत गणेशोत्सव थाटामाटात साजरा केला जात असून सर्वत्र चैतन्याचे वातावरण आहे. लक्षवेधी सजावट आणि डोळे दिपवून टाकणाऱ्या आकर्षक रोषणाईने शहर उजाळून निघाले आहे. मात्र दरवर्षीप्रमाणे यंदाही नाक्यानाक्यावर, चौकाचौकात आणि गल्लीबोळात नेत्यांच्या शुभेच्छा फलकांनी शहराचे विद्रुपीकरण झालेले आहे.

बेकायदेशीररित्या फलकबाजी करून शहराचे विद्रुपीकरण करण्यावर उच्च न्यायालयाने वारंवार खडसावूनही शहर नेतेमंडळींच्या फलकांनी भरून गेले आहे. ठिकठिकाणी फलकबाजी करून नियमांचे व आदेशाचे उल्लंघन झालेले पाहायला मिळत आहे. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवाच्या माध्यमातून शक्तीप्रदर्शन करून मतदारांना आकर्षित करण्याची संधी राजकीय मंडळी साधत आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे मंडप व प्रवेशद्वार, महत्वाचे चौक, नाका, कमानी आणि रस्त्याच्या दुतर्फा फलकबाजी करण्यात आली आहे. त्याला कोणताही पक्ष, गट-तट अपवाद नाही. राजकीय मंडळी, पदाधिकारी, आमदार व नगरसेवक होण्यास इच्छुक नेत्यांनी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देणारे छोटे – मोठे फलक ठिकठिकाणी लावून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.



राजकीय मंडळींसह विविध कंपन्या व उत्पादने आणि इतर विविध गोष्टींच्या जाहिरातबाजीचे फलक विविध ठिकाणी लागले आहेत. गणेशोत्सवाच्या काळात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते. थाटामाटात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची आर्थिक बाजू भक्कम असणे अत्यंत आवश्यक असते. वर्गणी, देणगी आणि राजकीय मंडळींकडून व विविध कंपन्यांच्या जाहिरातीच्या माध्यमातून मंडळांकडे देणगी जमा होत असते. त्यामुळे शुभेच्छांचे फलक गल्ली-बोळात दिसतात. मोठ-मोठ्या कंपन्या सणांच्या काळात रस्त्यावर कमानी उभारून जाहिराती करतात. त्यासाठी मंडळांना देणगी देतात. यंदाही कंपन्यांच्या त्यांच्या उत्पादनांच्या जाहिराती दिसत आहेत. मात्र, त्यापेक्षा यंदा नेत्यांच्या कमानींची संख्या अधिक दिसत आहे.

### कंपन्यांपेक्षा नेत्यांच्या जाहिराती

मोठ-मोठ्या कंपन्या सणांच्या काळात रस्त्यावर कमानी उभारून जाहिराती करतात. त्यासाठी मंडळांना देणगी देतात. यंदाही कंपन्यांच्या त्यांच्या उत्पादनांच्या जाहिराती दिसत आहेत. मात्र, त्यापेक्षा यंदा नेत्यांच्या कमानींची संख्या अधिक दिसत आहे.

# कल्याण-शील फाटा कोंडीमुक्त होणार?




● कल्याण , रोहित जैसवार :

कल्याण-शिळफाटा आणि मुंब्रा-पनवेल जोड रस्त्यांवरील कल्याण फाटा चौकात उड्डाण पूल उभारणीच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याच्या हालचाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सुरू केल्या आहेत. तीन वर्षापूर्वी कल्याण शिळफाटा रस्त्यावरील वाहन कोंडीचा विचार करून शासनाने या रस्त्यावर तीन उड्डाण पूल उभारणीचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये कल्याण फाटा येथे उड्डाण पूल आणि भुयारी मार्गाचा समावेश आहे. २०० कोटी खर्चाचे हे काम आहे. एमएमआरडीएचे कार्यकारी अभियंता गुरुदत्त राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याची निविदा प्रक्रिया एमएमआरडीएने सुरू केली आहे.

पान २ वर

## ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरणासाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदत

● मुंबई, यश सावंत :

ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी स्वरूपात अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे, अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे. १५ सप्टेंबर नंतर मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी.

## थोडक्यात



### पुण्यातूनही सुरू होणार वंदे भारत एक्सप्रेस

● पुणे, अभिजीत येरल्लू :

पुण्यातूनही वंदे भारत एक्सप्रेस सुरू होणार आहे. पुणे ते हुबळी या मार्गावर १५ सप्टेंबरपासून एक्सप्रेस धावणार आहे. त्यामुळे आता पुणे ते सांगली असा तीन तासांचा प्रवास फक्त ५५ मिनिटांमध्येच पूर्ण होणार आहे. राज्यात लवकर विधानसभा निवडणुका असल्यामुळे काही शहरात वंदे भारत एक्सप्रेस सुरू होणार आहेत. १५ सप्टेंबर रोजी देशात १० वंदे भारत एक्सप्रेस सुरू होणार (Vande Bharat Express) आहेत. यामध्ये पुणे ते हुबळी वंदे भारत एक्सप्रेस समावेश आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटक जलदगतीने रेल्वेने जोडले जाणार आहे. हुबळीहुन पहाटे पाच वाजता सुटणारी वंदे भारत एक्सप्रेस पुण्यात दुपारी दीड वाजता पोहोचणार आहे, तर पुण्याहून हुबळीला दोन वाजून दहा मिनिटांनी निघणारी वंदे भारत एक्सप्रेस रात्री पावणे अकरा वाजता हुबळीला पोहोचेल.

### लघुवाद न्यायालयातील अनुवादकाला लाच स्वीकारताना अटक

● मुंबई, यश सावंत :

दाव्याचा निकाल बाजूने लावण्यासाठी हॉटेल व्यावसायिकाकडे २५ लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपाखाली लघुवाद न्यायालयातील अनुवादक दुभाषिक विशाल सावंत यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवारी अटक केली. त्याच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदारांच्या हॉटेलच्या मालकी हक्काबाबत धोबी तलाव येथील लघुवाद न्यायालयात दावा दाखल आहे.

या दाव्याचा निकाल अंतिम टप्प्यात प्रलंबित आहे. या दाव्याचा निकाल बाजूने लावून देतो असे सांगून आरोपी लोकसेवक विशाल सावंत यांनी तक्रारदाराकडे २५ लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदारांनी याप्रकरणी लाचलुचपत प्रतबंधक विभाग, मुंबई कार्यालय येथे तक्रार केली. तक्रारीची ९ सप्टेंबर रोजी पडताळणी करण्यात आली. त्यात सावंत यांनी तक्रारदाराच्या बाजूने निकाल लावण्यासाठी २५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

# दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना मिळणार मिल्कोस्कॅन यंत्र

● मुंबई, विशाल कारंडे :

अन्न व औषध प्रशासन विभागाने उत्सवादरम्यान नागरिकांना निर्भेळ, सकस खाद्यपदार्थ मिळावेत यासाठी १ सप्टेंबरपासून विशेष मोहीम हाती घेतली आहे. मात्र दुधातील भेसळ ओळखताना अन्न निरीक्षकांना अवघड होते. त्यावर मात्रा म्हणून आता अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना मिल्कोस्कॅन यंत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे भेसळयुक्त दूध तात्काळ ओळखणे शक्य होणार आहे.



दुधामध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन कारवाई करीत असते. अन्न व औषध प्रशासनाकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त दूध नष्ट केले जाते. दुधामध्ये चुना व युरिया यासारखे घटक मिसळण्यात येतात. मात्र ही बाब अन्न निरीक्षकांच्या सहज लक्षात येऊ लागल्याने आता भेसळ करणाऱ्यांनी दुधात भेसळ करण्यासाठी विविध पर्याय शोधले आहेत. अनेक जण एसएनएफ व फॅटचे प्रमाण राखण्यासाठी दुधामध्ये तेल, तसेच दुधाची पावडर मिसळतात.

पान २ वर

# अपघातावेळी ऑडीमध्ये ‘बावनकुळे’च होते

## नागपूर पोलिसांचा खुलासा

● नागपूर, नितीन देवळेकर :

‘ऑडी हिट अँड रन’ प्रकरणाला आता नवं वळण लागलंय. रविवारी मध्यरात्री नागपुरात ऑडी कारनं तीन वाहनांना धडक दिली होती. ही ऑडी कार राज्यातील भाजपाच्या बड्या नेत्याच्या मुलाची असल्याची प्राथमिक माहिती मिळाली होती. मात्र, यावर पोलिसांनी बोलण्यास नकार दिला होता. आता या प्रकरणावर पोलिसांनी स्पष्टीकरण दिलंय.



अपघात झाला त्यावेळी ‘ऑडी’मध्ये तीन लोकं होते. अर्जुन हावरे, रोनित चिंतनवार व संकेत बावनकुळे हे तिघे या ‘ऑडी’मध्ये बसले होते. अपघातावेळी संकेत बावनकुळे कारमध्ये होता, हे अखेर आज नागपूर पोलिसांनी मान्य केलंय. संकेत हा ‘ऑडी’ कार चालवणाऱ्या अर्जुनच्या बाजूला बसला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. संकेत हा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा आहे.

अपघातानंतर नागरिकांनी अर्जुन आणि रोनित या दोघांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं होतं. तर संकेत बावनकुळे हा घटनास्थळावरून निघून गेला होता. सीताबर्डी पोलिसांनी अर्जुन आणि रोनित यांची वैद्यकीय चाचणी केली असता, दोघांनीही मद्य प्राशन केलं असल्याचं समोर आलं. तर अर्जुन हा कार चालवत होता. त्यामुळं अर्जुन हावरेविरोधात गुन्हा दाखल केला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

“सुरुवातीच्या तपासात संकेत बावनकुळे हा कारमध्ये होता की नाही? या संदर्भात स्पष्टता नव्हती. मात्र, पुढील तपासात ही बाब समोर आली. संकेत बावनकुळे हा त्या कारमध्येच होता. अर्जुन आणि रोनितला ताब्यात घेऊन आम्ही जेव्हा चौकशी केली, तेव्हा त्या माहितीवरून संकेत त्या कारमध्ये होता हे समजलं.

पान २ वर

# जयदीप आपटेला १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी



● सिंधुदुर्ग , दिगंबर जाधव :

ॲड. तुषार भणगे म्हणाले की, आरोपी जयदीप आपटे विसंगत माहिती देतोय.त्यामुळे सात दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती,परंतु न्यायालयाने १३ तारखेपर्यंत (तीन दिवसांची)पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपी चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.नवीन कायद्यानुसार पोलिसांना जेव्हा हा आरोपी हवा असेल त्यावेळी न्यायालयाच्या परवानगीने पोलीस त्याला ताब्यात घेऊ शकतात.

पान २ वर

# देवेंद्र फडणवीसांच्या कृपेने मला कधीही अटक होऊ शकते - अनिल देशमुख

● नागपूर, नितीन देवळेकर :

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 4 वर्षांपूर्वीची घटना उकरुन काढत माझ्याविरुद्ध दिल्लीच्या मदतीनं सीबीआयनं एफआयआर दाखल केलाय. 4 वर्षांपूर्वी मी गृहमंत्री असताना जळगाव येथील एका घटनेत भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्यावर कारवाई करण्यासाठी मी जळगावच्या पोलीस अधिकाऱ्यावर दबाव टाकला होता, असा आरोप माझ्यावर करण्यात आलाय. माझ्या माहितीनुसार माझ्यावर धाडी



टाकून मला अटक करण्याचा प्रयत्न देवेंद्र फडणवीस करत आहेत, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केलाय.

तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुखांवर जळगावच्या एका पोलीस अधिकाऱ्यांवर दबाव टाकल्याप्रकरणी सीबीआयनं आठ दिवसांपूर्वी गुन्हा दाखल केलाय. यासंदर्भात बोलताना अनिल देशमुख म्हणाले, “देवेंद्र फडणवीसांनी दिल्लीच्या मदतीनं सीबीआय आणि ईडी या संस्थेला हाताशी धरुन महाराष्ट्राचं राजकारण अतिशय खालच्या स्तरावर आणलंय. मी त्यांना सांगू इच्छितो की, मी माझ्या अटकेची वाट पाहतोय.”

पुढं देशमुख म्हणाले, “तीन वर्षांपूर्वी अशा पद्धतीनं देवेंद्र फडणीस यांनी परमवीर सिंग आणि सचिन वाजे याला बरोबर घेतलं आणि त्यांना माझ्यावर आरोप करायला लावलं. त्या दोघांनी माझ्यावर आरोप केले होते.

पान २ वर

# अंबरनाथमध्ये १५ वर्षीय मुलीवर रिक्षा चालकाकडून अत्याचार




● ठाणे, सम्यक कासारे :

राज्यात बदलापूर येथील घटनेचे अद्याप पडसाद उमटत असून अत्याचाराच्या घटनेने अंबरनाथ हादरले आहे. एका रिक्षा चालकाने मुलीला घरी सोडण्याच्या बहाण्याने नेत अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी रिक्षा चालकास बेड्या ठोकल्या आहेत. अंबरनाथमध्ये वास्तव्यास असलेली १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी हि अंबरनाथ पश्चिम भागातून घरी जात असताना रिक्षा चालकाने तिला घरी सोडण्याच्या बहाण्याने रिक्षात बसवलं. त्यानंतर तिला मोरिवली डम्पिंग ग्राउंडवर नेत तिच्यावर अत्याचार केला. घडल्या प्रकाराबाबत पीडित मुलीने पोलिसांकडे तक्रार केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत शिवाजीनगर पोलिसांनी लागलीच घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरुवात केली. याप्रकरणी मुलीच्या तक्रारीवरून अत्याचार आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रिक्षा चालकालाही बेड्या ठोकल्या आहेत.

# महायुतीचा प्रस्ताव आणि अजित पवारांची मुख्यमंत्रीपदाची इच्छा?

## अमित शाहांसोबत नेमकी काय चर्चा झाली?



● मुंबई, विशाल पाटील :

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसीय मुंबई दौऱ्यावर होते. या दौऱ्याच्या निमित्ताने अमित शाह यांनी मुंबई एअरपोर्टवर महायुतीच्या राज्यातील प्रमुख नेत्यांसोबत बैठक केली. या बैठकीत अमित शाह यांच्याकडे भाजपच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काही प्रस्ताव ठेवला. तर राष्ट्रवादीच्या अजित पवार यांनी देखील काही इच्छा व्यक्त केल्याची माहिती समोर आली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने मुंबईतील एअरपोर्टवर एक महत्त्वाची बैठक पार पडली.

पान २ वर

# शिवरायांची समाधी लोकमान्य टिळकांनी शोधली असं म्हणणे इतिहासाचे विकृतीकरण : जितेंद्र आव्हाड

● मुंबई, विशाल कारंडे :

शिवजयंती उत्सवसुद्धा महात्मा फुलेंनीच सुरू केला हा सुद्धा इतिहास आहे,असे वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक मोहन भागवत यांनी केले आहे. मोहन भागवतांच्या या वक्तव्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे. झाडाझुडपात भरलेली समाधी ही महात्मा जोतिबा फुले यांनीच शोधली आहे. तुम्ही इतिहासाचे विकृतीकरण करत आहात, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.



जितेंद्र आव्हाड म्हणाले, मोहन भागवतजी इतिहासाच्या कुठल्याही पानावर लिहिलेले नाही की, छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी टिळकांनी शोधून काढली. वास्तविक पाहता छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगडावरील समाधी महात्मा जोतिबा फुले यांनी शोधून काढल्याबाबत कोणत्याही इतिहासकारांमध्ये मतभेद नाहीत. ही समाधी त्यांनी अत्यंत कष्टाने शोधून काढली. झाडाझुडपात लपलेली ही समाधी शोधत असताना तेथील मनुवाद्यांनी महात्मा फुले यांना त्रासदेखील दिला होता. पण, या मनुवाद्यांना न जुमानता छत्रपती शिवरायांची समाधी व्यवस्थित करून घेतली ती फक्त आणि फक्त महात्मा जोतिबा फुले यांनीच! आपण जे बोलता त्यालाच आम्ही इतिहासाचे विकृतीकरण म्हणतो.

पान २ वर

# संपादकीय

## 'क्रिस्टल मेथ'चा सापळा

क्रिस्टल मेथचा भारतात वाढता वापर हा सरकारसाठी चिंतेचा विषय आहे. जगभरातील आणि भारतातील तरुणांचे आयुष्य बरबाद करून टाकणार्या या ड्रगची महत्त्वाची माहिती जाणून घेऊया. क्रिस्टल मेथमुळे एक वेगळीच नशा, धुंदी, ऊर्जा शरीरात संचारते, असे व्यसनाधीन झालेले लोक सांगतात. हा मेथॅम्फेटामाइन ड्रगचा उत्तेजक आणि मादक पदार्थांच्या यादीत येणारा एक प्रकार आहे. स्फटिकरूप असल्यामुळे त्याला क्रिस्टल मेथ म्हणतात. याच्या नशेचे सेंट्रल नर्वस सिस्टीमवर थेट परिणाम होतात. क्रिस्टल मेथ ड्रग इंजेक्शनमधून, नाकावाटे ओढून, हुक्क्यामधून किंवा गोळ्यांच्या स्वरूपात घेतात. सिग्रेट किंवा हुक्क्यात ओढल्यास मेथचा गोड, रासायनिक असा वास येतो. इंजेक्शन सर्वात धोकादायक. क्रिस्टल मेथ पाण्यात विरघळून ते पाणी इंजेक्शनमधून रक्तवाहिनीमध्ये सोडली जाते. ड्रग मेंदूत वेगाने पोचावा व लवकर मजा मिळावी याकरिता अनेकजण इंजेक्शनचा पर्याय निवडतात. क्रिस्टल मेथ ड्रग मेंदूत डोपामाइनचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढवण्याचे काम करते. यामुळे सेवन करणार्या व्यक्तीत आनंद आणि उत्साहाची भावना निर्माण होते. याचे परिणाम ( घेतलेल्या मेथच्या मात्रे प्रमाणे) शरीरावर एक ते चार तास किंवा अधिक काळ राहतात. एकूणच, हा अत्यंत चटक लावणारा मादक पदार्थ आहे.

जगभरात याचा खप आहे तरी किती? मारिजुआना, कोकेन, मेथॅम्फेटामाइन, फेंटॅनाइल आणि हेरॉइनचा समावेश जगभरात सर्वाधिक सेवन केल्या जाणार्या प्रतिबंधित ड्रग्सच्या यादीत होतो. युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्स आणि क्राइमच्या आकडेवारीनुसार, सध्या मेथॅम्फेटामाइन हे जगातील सर्वाधिक प्रमाणात सेवन किंवा गैरवापर केले जाणारे कृत्रिम उत्तेजक औषध आहे. यापासूनच क्रिस्टल मेथ तयार केले जाते. मेथॅम्फेटामाइन बरोबर शिसे आणि अगदी टाकाऊ बॅटर्या रसायनात टाकून क्रिस्टल मेथ पावडर बनते. मेक्सिको व्यतिरिक्त म्यानमार, लाओस, थायलंड, झेक प्रजासत्ताक आणि पश्चिम आफ्रिकन देशांमध्ये जगातील सर्वाधिक बेकायदेशीर मेथॅम्फेटामाइन तयार करण्याचे अड्डे आहेत. युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्ज अँड क्राइमच्या आकडेवारीनुसार, जगभरात सुमारे 24.7 दशलक्ष लोकांना ॲम्फेटामाइन प्रकारच्या (मेथॅम्फेटामाइन हा याच ड्रग्ज समूहातील एक प्रकार) ड्रग्सचे व्यसन आहे. ऑस्ट्रेलिया, युनायटेड स्टेट्स, कॅनडा, फिलिपाइन्स, थायलंड, झेक प्रजासत्ताक, स्लोव्हाकिया या देशांमध्ये मेथचा वापर सर्वात जास्त होतो. मेथ अमेरिका आणि युरोपियन देशात खूप सहजपणे उपलब्ध आहे. भारतातदेखील अंमलीपदार्थ विकणारे क्रिस्टल मेथची लपून-छपून विक्री करतात. पंजाब, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, आसाम, गुजरात, मणिपूर आणि तामिळनाडूत क्रिस्टल मेथ विकली जाते. एनसीबीच्या अहवालानुसार, यापैकी काही राज्यात आंतरराष्ट्रीय ड्रग सिंडिकेट्सने ड्रग्सची निर्मिती देखील सुरू केली आहे. नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरोच्या एका अंदाजानुसार, भारतात प्रति किलोमागे याची दोन ते तीन कोटी रुपये इतकी किंमत आहे. नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो, नौदल, तटरक्षक दल, सीमाशुल्क अधिकारी तसेच विविध राज्यांचे अंमलीपदार्थ विरोधी पथक कारवाईत मेथचे मोठे साठे जप्त करतात. मे 2023 दरम्यान नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो व नौदलाने मिळून केरळ किनारपट्टीवर पाकिस्तानी जहाजातून आलेली अडीच हजार किलो मेथ जप्त केली. या वर्षी फेब्रुवारीमध्ये नौदल आणि एनसीबीने गुजरातच्या किनारपट्टीवर 3 हजार 300 किलो ड्रग जप्त केले. यापैकी क्रिस्टल मेथचा साठा 158.3 किलो होता. पुढे मार्चमध्ये महसूल गुप्तचर संचालनालयाने चेन्नईमध्ये 36 किलो मेथ जप्त केली. यावरून भारतात क्रिस्टल मेथची मोठी मागणी असल्याचे दिसून येते. इकडे लहानपणची कविता आठवते, आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे स्वतःला आनंदी आणि उत्साही ठेवण्याच्या नादात लोक स्वतःकडे मृत्यू ओढून घेतात. ड्रगचा प्रभाव कमी होताच सेवन करणार्या व्यक्तीला चिंता आणि नैराश्य जाणवू लागते. मेथॅम्फेटामाइनमुळे ब्लड प्रेशर, हृदयाची धडधड आणि शरीराचे तापमान वाढतं. ड्रग घेण्याची सवय लागणे सोपे; पण ती घालवता- घालवता नाकीनऊ येते. मेथ सेवन करण्याची सवय लागल्यावर स्वतःवर नियंत्रण ठेवणे अवघडच.मेथ सेवन बंद केल्यावर थकवा, निराशा, डोकेदुखी, भूक न लागणे, स्नायूंचे दुखणे, निद्रानाश असे आजार सुरू होतात. मेथ घेण्याची तीव्र इच्छा होते.



## आजची चित्रोळी

आमच्या काळी छत्र्या नव्हत्या
पाना आड लपायचे !
नसलंच कांहीं जवळ तर
ओल्या पावसात भिजायचे !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,
विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### कल्याण-शीळ फाटा कोंडीमुक्त होणार?

कल्याण फाटा येथे उड्डाण पूल उभारणीचा संकल्पन बांधकाम आराखडा नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने तयार करायचा आहे. ४२ महिन्यांमध्ये हे काम पूर्ण करण्याची अट निविदेत टाकण्यात आली आहे.

या उड्डाण पूल आणि भुयारी मार्गामुळे बदलापूर, अंबरनाथ काटई मार्गे शिळफाटा चौक दिशेने येणारी, कल्याण, भिवंडी, डोंबिवली, उल्हासनगरकडून येऊन नवी मुंबईकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने कल्याण फाटा येथे (दत्त मंदिर) उड्डाण पुलावरून थेट एमआयडीसीच्या जलवाहिन्यांवरील पुलावरून महापे-नवी मुंबई दिशेने जातील. ठाणे-मुंब्रा भागाकडून येणारी वाहने कल्याण फाटा येथील उड्डाण पुलाखालील भुयारी मार्गिकेतून पनवेल, तळोजा भागाकडे जातील. यामुळे कल्याण फाटा चौकात होणाऱ्या वाहन कोंडीतून आणि प्रवाशांची खोळंब्यातून कायमची मुक्तता होणार आहे. ग्रेड सेपरेशन या प्रणालीद्वारे हे काम केले जाणार आहे.

डोंबिवली, कल्याण, बदलापूर भागातून येणारी वाहने कल्याण फाटा (दत्त मंदिर चौक) येथून एमआयडीसीच्या जलवाहिन्या असलेल्या पोहच रस्त्यावरून खिंडीतून थेट महापे -नवी मुंबईकडे जातील, असे सुरुवातीला या पुलाचे नियोजन करण्यात आले होते. शिळफाटा खिंडीतील एमआयडीसीच्या जलवाहिन्या अन्य भागात स्थलांतरीत करण्याचे काम खूप खर्चिक आहे. त्यामुळे जलवाहिन्या आहे त्याच ठिकाणी ठेऊन उड्डाण पुलाची सीमारेषा बदलून जलवाहिन्यांवरून पुलाची मार्गिका खिंडीतून महापे रस्त्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर उतरविण्यात येणार आहे. पुलावरील मार्गिका तीन मार्गिकेची करण्यात येणार होती. खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी एमएमआरडीएकडे पाठपुरावा करून ही मार्गिका चार मार्गिकेची करावी आणि त्यासाठी वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. ही मागणी चार वर्षापूर्वी प्राधिकरणाने मान्य केली आहे.

या उड्डाण पुलांव्यतिरिक्त काटई नाका, सुयोग हॉटेल (रिजन्सी अनंतम प्रवेशव्दारासमोर ) येथे उड्डाण पूल प्रस्तावित आहेत. या पुलांमुळे या दोन्ही चौकांमध्ये होणारी कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. पनवेल, नवी मुंबई, ठाणे, मुंबई भागातून शिळफाटा रस्त्यांवरून जाणारी वाहने उड्डाण पुलांवरून थेट इच्छित स्थळी निघून जातील. स्थानिक शहरांतर्गत वाहने या पुलांखालून इच्छित स्थळी जाणार आहेत, असे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याने सांगितले.यासंदर्भातच्या अधिक माहितीसाठी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना संपर्क केला. त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

### दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न सुरक्षा...

एक लिटर दुधामध्ये ८०० मिलि लीटर दूध तर २०० मिलि लीटर दूध पावडर आणि तेल वापरल्यास दुधामध्ये केलेली भेसळ लक्षात येत नाही. तसेच अनेक वेळा दूध प्रमाणित मानकानुसार नसते. त्यामुळे अन्न निरीक्षकांना दुधातील भेसळ सहज ओळखणे अवघड होते. ही बाब लक्षात घेता राज्यातील सर्व अन्न निरीक्षकांना दुधातील भेसळ रोखणे शक्य व्हावे यासाठी 'मिल्कोस्कॅन' हे यंत्र उपलब्ध करण्यात येणार आहे. यामुळे दुधातील भेसळ ओळखणे अन्न निरीक्षकांना सहज शक्य होईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्याने दिली.

### अपघातावेळी ऑडीमध्ये 'बावनकुळे'च होते

त्यामुळं सोमवारी रात्री संकेतला बोलावून चौकशी केली," अशी माहिती पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी दिली.

तिघेही रात्री हॉटेलमधून जेवण करून येत होते, असं देखील तपासात स्पष्ट झालं. मात्र, संकेत बावनकुळे यानं देखील मद्य प्राशन केलं होतं की नाही हे स्पष्ट झालं नाही. यासंदर्भात पोलीस अधिक तपास करत आहेत.

अपघातातील ऑडी कार ही भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाची होती, अशी माहिती मिळाली होती. राजकीय दबावाखाली पोलीस तपास करत असल्याचं बोललं जात होतं. मात्र, आता यावर पोलिसांनी स्पष्टीकरण दिलंय. "अपघात प्रकरणाचा तपास करताना आमच्यावर कुणाचाही राजकीय दबाव नाही. अपघाताचे सीसीटीव्ही डिलीट केलx हे सत्य नाही. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे, असं स्पष्टीकरण पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी दिलं.

### जयदीप आपटेला १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

जयदीप आपटे याच्याकडून पोलिसांना अधिक माहिती मिळवायची आहे. या प्रकरणातील इतर व्यक्तींची माहिती पोलिसांना मिळवायची असल्यानं सात दिवसांची पोलीस कोठडी मागण्यात आली होती. या प्रकरणात तपासकाम करणं गरजेचं असल्यानं न्यायालयानं आमचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीला 13 ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर राज्यभरातील शिवप्रेमींनी संताप व्यक्त केला होता. कोल्हापूर पोलिसांनी चेतन पाटील याला ताब्यात घेत सिंधुदुर्ग पोलिसांच्या ताब्यात दिलं होतं. सिंधुदुर्ग पोलिसांनी चेतन पाटील यांना अटक केली होती. आज पाटील यांना न्यायालयानं दिलासा दिला आहे, त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली आहे.

### देवेंद्र फडणवीसांच्या कृपेने मला कधीही अटक...

त्यांनी आरोप केल्यानंतर त्यांची चौकशीही झाली. चौकशी झाल्यानंतर केस हायकोर्टामध्ये गेली. त्यावेळी हायकोर्टानं निकाल दिलाय अनिल देशमुख यांच्या विरुद्ध कोणतेही पुरावे नाही. केवळ ऐकीव माहितीच्या आधारे अनिल देशमुख यांच्यावर आरोप झालेत. ते प्रकरण आटोपत असताना आता मी पोलीस अधिकाऱ्यांवर दबाव टाकल्याचं नवं कारस्थान रचलं गेलंय. भारतीय जनता पार्टीच्या नेत्याला अटक करा, अशा पद्धतीनं पोलीस अधिकाऱ्यावर दबाव टाकला असा त्यांचा आरोप आहे. हे सर्व देवेंद्र फडणवीसांचं कारस्थान आहे. तीन वर्षांपूर्वी त्यांनी अशाच पद्धतीनं माझ्यावर खोटा आरोप केला. मात्र, चौकशीला मी सामोरं जाईल", असं अनिल देशमुख म्हणालेत.

### महायुतीचा प्रस्ताव आणि अजित पवारांची...

या बैठकीत राज्यातील आगामी निवडणुकीबाबत चर्चा पार पडली. या चर्चेत भाजपच्या वतीने २५ जागांवर मैत्रीपूर्ण लढतीचा प्रस्ताव ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यात सध्या महायुतीने जागा वाटप सुरु आहे. या जागा वाटपात अनेक ठिकाणी वाद होण्याची शक्यता आहे. कारण सध्या तीनही घटक पक्षातील प्रत्येक उमेदवाराला निवडणुक लढवण्याची इच्छा आहे. परंतु महायुती टिकवायची असेल तर सध्या तरी हे शक्य होणार नसल्याच पाहिला मिळत आहे. त्यामुळेच भाजपच्यावतीने मैत्रीपूर्ण लढतीचा प्रस्ताव ठेवण्यात आल्याची एबीपी माझाला सूत्रांनी माहिती दिली आहे महायुतीमध्ये वाद निर्माण होतील अशा प्रामुख्याने जागा पाहिल्या तर यामध्ये इंदापूर, मावळ, अमरावती, वडगाव शेरी अशा प्रमुख जागांचा उल्लेख होतो. कारण याठिकाणी थेट लढत ही भाजप आणि राष्ट्रवादीत पहायला मिळाली होती. एबीपी माझाला मिळालेल्या माहितीनुसार महायुतीत वाद निर्माण होतील अशा तब्बल ६० जागा आहेत

आगामी काळातील वाद लक्षात घेऊन महायुतीत सामोपचाराची भूमिका घेतली जाईल अशी सध्या तरी परिस्थिती पहायला मिळत आहे. या अनुषंगाने ज्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी मैत्रीपूर्ण लढत होणार नाही, तसेच ज्यांचा आमदार त्याला पुन्हा संधी हे धोरण राहिल अशी भूमिका मांडली आहे. तसेच वाद निर्माण होणाऱ्या जागांवर येत्या ८ दिवसांत तोडगा काढला जाईल असंही सांगितलं आहे.

मुख्यमंत्रीपदाचा प्रस्ताव नाही एकीकडे मैत्रीपूर्ण लढतीचा विषय असताना दुसरीकडे एका इंग्रजी दैनिकाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी थेट अमित शाह यांच्यासोबत वन टू वन झालेल्या चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बिहार पॅटर्नप्रमाणे मुख्यमंत्री पद द्यावं अशी मागणी केली असल्याचं वृत्त दिलं आहे. यावर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि अजित पवार यांनी या धांदात खोट्या बातम्या असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

महायुतीच्या जागा वाटपात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला कमी जागा येणार हे चित्र स्पष्ट आहे. त्यामुळे आपोआपच ज्याच्या जास्त जागा निवडून येतील त्याला मुख्यमंत्री पदाची संधी मिळण्याची शक्यता दाट आहे. जागा वाटपात आणि जागा जिंकून येण्यात भाजप मोठा भाऊ ठरला तर पुन्हा एकदा अजित पवार यांचं मुख्यमंत्री पदी विराजमान होण्याचं स्वप्न अपूर्ण राहू शकत. त्यामुळेच कदाचित आताच मुख्यमंत्रीपदाचा शब्द घेण्याचा अजित पवारांचा प्रयत्न असावा अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

### शिवरायांची समाधी लोकमान्य टिळकांनी...

छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी ही महात्मा जोतीराव फुले यांनी शोधून काढली हा इतिहास कोणालाही बदलता येणार नाही त्याचप्रमाणे शिवजयंती उत्सवसुद्धा हा महात्मा जोतीराव फुलेंनीच सुरू केला त इतिहास आहे, अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

शिवाजी महाराज इथेच होऊन गेले. त्यांचं स्मरण व्हावं म्हणून जागरण केलं. रायगडावर उत्सव सुरू केला. टिळकांनी ते सगळं शोधून काढलं. धर्म ही आपली मूळ प्रेरणा आहे. तो आपला प्राण आहे. तो स्वीकारला तरच राष्ट्राचे उत्थान होते. अन्यथा देशाचा अधःपात होतो. धर्माविषयीचा तपशील महत्वाचा आहे. आज राष्ट्र मोठं होत असल्याचे ज्यांना पाहवत नाही त्यांच्याकडून धर्मावर वेगवेगळ्या माध्यमातून, वेगवेगळ्या रूपात आक्रमण होत आहे. मात्र त्याचा प्रतिकार करण्यासाठी आपण समर्थ आहोत. तंजावरचे मराठे हे पुस्तक त्यासाठी प्रेरणा ठरणार आहे, असे मोहन भागवत म्हणाले.

## मेढा नियोजित घनकचरा प्रकल्पास सोनगाव ग्रामस्थांचा विरोध.....

**आनेवाडी:-** जावली तालुक्यातील तालुक्याचे ठिकाण असलेल्या मेढा नगरपंचायतीने सोनगाव येथील जागेत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प नियोजित केलेला आहे. हा घनकचरा प्रकल्प होवू नये. यासाठी सोनगाव ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला. तशा आशयाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिलेले आहे. त्याच निवेदनाला ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयातून मेढा नगरपंचायतीला दिलेल्या सुचनांचे पत्र सादर केलेले आहे.



आज मंगळवारी दिनांक 10 सप्टेंबर रोजी दुपारी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई व आमदार शशिकांत शिंदे यांची भेट घेऊन सोनगाव ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी सोनगाव ग्रामस्थ जयदीप शिंदे, जगन्नाथ पिसाळ, मधूकर शिंदे, जितेंद्र शिंदे, लक्ष्मण चिकणे, जितेंद्र चिकणे, विश्वनाथ शिंदे, अविनाश तिवाटणे, युवराज शिंदे, नारायण शिंदे, संपत चिकणे, नथूराम चिकणे, सत्यवान शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जयदीप शिंदे म्हणाले, जिल्हाधिकाऱ्यांनी चार महिन्यापूर्वी सोनगाव ग्रामस्थाबाबत बाबत एक अन्यायकारक आदेश काढला आहे. मेढा नगरपंचायतीचा कचरा सोनगावच्या गायरान क्षेत्रात टाकण्याचा घाट घातला आहे. या निर्णयाचा तीव्र निषेध करत आहोत. जिल्हाधिकाऱ्यांनी २०२१ साली सुद्धा ग्रामसभेचा ठराव पुर्णपणे विरोधी असून सुद्धा गायरान या क्षेत्रात पुर्वी वीज वितरण कंपनीला जागा दिलेली आहे त्यातली अर्धी जागा शिल्लक असताना ती जागा आमच्या गावातील पाळीव जनावरांना गवत चरण्यासाठी होती. २००आंब्याची झाडे आहेत. त्याचा विचार न करता मेढा नगरपंचायतीचा नियोजित घनकचरा प्रकल्प सोनगावच्या गायरान जमिनीत करण्यात येणार आहे. तो आदेश रद्द करावा. त्याऐवजी मेढा नगरपंचायतीच्या हद्दीत शासकीय जागा उपलब्ध आहेत. मेढयापासून सोनगाव हे तेरा किलोमीटरवर आहे. त्याचा कचरा येथे आणायचा आणि विल्हेवाट लावायची ही योग्य बाब नाही. प्रतापगड कारखाना कामगार वसाहत आहे. कारखान्याचे ऑफिस, शाळा, वाढीव गाव आहे. लोकवस्तीत हा कचरा प्रकल्पाचा घाट कशासाठी? हा प्रकल्प रद्द करावा, अशी मागणी केली आहे. दरम्यान याबाबत पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सदर निवेदनाची तपासणी करून योग्य ते निर्णय घेतला जाईल असे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

## भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १२९ वि जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर



अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले.

त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या वतीने तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावीत यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन

**पालघर (जिमाका):** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या वतीने प्रशिक्षण संस्थेची निवड केली जाणार आहे. निवडण्यात येणा-या संस्थेद्वारे मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील गरजू तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावीत म्हणून प्रशिक्षण दिले जाणार आहे. पालघर जिल्हा कार्यालयास सन 2024-25 या वित्तीय वर्षाकरिता एकूण 200 प्रशिक्षणार्थींचे कौशल्य विकास उदयोजकता प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदिदष्ट मुख्य कार्यालयाकडून प्राप्त झालेले आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील कुटुंबाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावी म्हणून समाजातील गरजूंना आवश्यक त्या व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्याकरिता प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. प्रशिक्षणार्थीने निवडलेल्या प्रशिक्षणाची फी कौशल्य विकास व उदयोजकता विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे केली जाणार आहे. प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानुसार आवश्यक त्या प्रशिक्षणाला बसविण्याची जबाबदारी संस्थाचालकाची राहील. प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण कालावधीनुसार टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण फि अदा करण्यात येईल.

प्रशिक्षण घेण्यासाठी अर्जदाराची आवश्यक असलेली पात्रता पुढीलप्रमाणे : अर्जदार मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील असावा, अर्जदार महाराष्ट्रातील रहिवाशी असावा, अर्जदाराचे वय 18 ते 50 असावे, अर्जदाराने यापूर्वी शासनाच्या, महामंडळाच्या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा, अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न 300000/- पेक्षा जास्त नसावे, एका कंटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल, अर्जदाराने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशिल सादर करावा लागेल.

या अंतर्गत पालघर जिल्हयातील ज्या संस्थांनी कौशल्य विकास व उदयोजकता प्रशिक्षण पोर्टलवर नोंदणी केलेली आहे अशा संस्था आपला प्रस्ताव दाखल करु शकतील.

पालघर जिल्हयाचे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अफरिन अपार्टमेंट, ए- विंग.रु.नं.203, विक्रीकर कार्यालया शेजारी, नवली रोड, पालघर पिन-401404 येथील कार्यालयात प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या अर्जदारांनी त्यांचा अर्ज तसेच सस्थाचालकांनी त्यांचा प्रस्ताव दिनांक 13/09/2024 पर्यंत 02 प्रतीत कार्यालयीन वेळेत सादर करावा.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मुख्यमंत्र्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी केले महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांचे कौतुक





■ ठाणे महानगरपालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाला दिली भेट
■ प्रियांका सौरभ राव यांचीही उपस्थिती

**ठाणे :** स्वतःचे कार्यालयाचे काम, घरची जबाबदारी सांभाळत ठाणे महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांनी आपली संस्कृती जपत, नव्या जुन्या पारंपरिक खेळाचा मेळ साधत नाविन्यपूर्ण मंगळागौर सादर केल्याबद्दल सर्व महिलांचे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे यांनी भरभरून कौतुक केले. ठाणे महानगरपालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सोमवारी महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात महापालिका कर्मचारी, मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी व ठाण्यातील सृजनसखी महिला यांनी मंगळागौर सादर केली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या पत्नी प्रियांका राव, माजी नगरसेविका नम्रता भोसले, उपायुक्त मीनल पालांडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. चेतना नितील, कार्यालयीन अधीक्षक रिमा देवरूखकर आदी उपस्थित होते. ठाणे महानगरपालिका कर्मचारी गणेशोत्सवाचे यंदाचे ४२ वे वर्षे आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गेली दोन वर्षे ठाणे महापालिकेच्या अधिकारी कर्मचारी पारंपरिक अशी मंगळागौर सादर करतात. यंदाही ठाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी नव्या जुन्या पारंपरिक खेळाचा मेळ साधत नाविन्यपूर्ण अशी मंगळागौर सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी सर्व महिलांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या पत्नी प्रियांका राव यांच्यासह खेळात सहभागी होत मंगळागौरीचा आनंद लुटला.

# ७ अनधिकृत नळजोडण्या तोडल्या

## पाणीपुरवठा विभागाची मुंब्रा आणि दिवा प्रभाग समिती क्षेत्रात कारवाई

**ठाणे :** मुंब्रा आणि दिवा प्रभाग समिती क्षेत्रात भोलेनाथ नगर, खरीवली, देवी नाला, ग्रीन पार्क या भागात एक इंच व्यासाच्या ९७ नळ जोडण्या पाणी पुरवठा विभागाने खंडित केल्या आहेत. याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.



गेल्या आठवड्यात, पाणी बील वसुलीबाबत अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी पाणी पुरवठा विभागाचे अभियंता आणि मीटर रिडर यांची बैठक घेतली. या बैठकीत, मीटर रीडरना साप्ताहिक उद्दीष्ट निश्चित करून देण्यात आले. तसेच, अवैध नळ संयोजने खंडित करण्यासाठी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. अनधिकृत इमारतींमध्ये पाण्याचा वापर सुरू असल्यास त्यावरही गुन्हे दाखल करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिले आहेत.

या निर्देशांच्या अनुषंगाने, मुंब्रा व दिवा प्रभागामध्ये कल्याण फाटा येथून ६६० मीमी व ३५० मीमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीमधून दररोज सुमारे ५७ दशलक्ष लीटर पाणी पुरवठा होतो. काही नागरिकांनी या मुख्य जलवाहिनीवर अवैधपणे नळ संयोजने घेतल्याचे निर्दशनास आले होते. त्यानुसार ही नळ संयोजने तोडण्याची कारवाई करण्यात आली.

# आमच्यामध्ये कोणताही श्रेयवाद नाही; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




**ठाणे :** राज्य सरकारच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी ठाण्याच्या किसननगर भागातून लाडकी बहीण कुटुंब भेट अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी वागळे इस्टेट भागातील १५ कुटुंबाची भेट घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री घरी आल्याने अनेकजण भारावून गेले होते. दरम्यान, शासकीय योजनांवरून महायुतीच्या नेत्यांमध्ये श्रेयवाद रंगल्याची चर्चेबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी आमच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा श्रेयवाद नसल्याचे स्पष्ट केले.

राज्य सरकारच्या १० योजनांची माहिती घरोघरी देण्यासाठी तसेच या योजनांचा लाभ मिळतो की, नाही याचा आढावा घेण्याच्या उद्देशाने शिवसेनेकडून राज्यभरात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण कुटुंब भेट' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोपरी- पाचपाखाडी मतदारसंघातील किसननगर आणि वागळे इस्टेटमधील १५ कुटुंबाची भेट देऊन केला. मुख्यमंत्र्यांनी महिलांशी संवाद साधत त्यांना शासकीय योजनांची माहिती दिली. या अभियानादरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आमच्यामध्ये कोणत्याही प्रकारची श्रेयवादाची लढाई नाही. आम्ही सरकार म्हणून एकत्रित काम करत आहोत. तसेच महायुतीतील आम्ही तिन्ही पक्ष एकत्रित कार्यक्रम राबवित आहोत. महायुतीमधील प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते लाभार्थी वंचित राहू नये म्हणून चहूबाजूंनी काम करत आहेत असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी शासन आपल्या दारी या योजनेत राज्यातील ५ कोटींहून अधिक नागरिकांना लाभ मिळाला. सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा दीड लाखांवरुन पाच लाख रुपये इतकी वाढविली आहे. हे सरकार शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, वारकरी, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच घटकांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला.

# गौरी-गणपती सणात घरोघरी चालविल्या जाणाऱ्या फुलांच्या गौरी (कलंत्री)च होतोय मनोभावे पुजन !

**वासिंद** - श्रावण महिना म्हणजे गौरी-गणपती सणाचा उपवास या महिन्यात घरोघरी व सार्वजनिक ठिकाणी गणपती उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येतो. या गणेशोत्सवा बरोबर येणारा सण म्हणजे गौरी उत्सव असून या गौरी- गणपती सणात घरोघरी चालविल्या जाणाऱ्या फुलांच्या गौरीलाही (कलंत्री) पुजनाही तितकसं महत्त्व असून या फुल गौरींची मनोभावे घरोघरी पुजन होत असल्याचे दिसून येते.

दिड-अडीच दिवसांच्या गणपती बाप्पाचे विसर्जनानंतर लगेच गौरी मातेच आगमन होते. पहिल्या दिवशी जेष्ठा गौरी आवाहन, दुसऱ्या दिवशी पुजन व तिसऱ्या दिवशी विसर्जन केले जाते. काही नवस म्हणून तर काही भाविक उत्सव म्हणून मूर्तीच्या गौरी मातेची स्थापना करून पुजन करीत असतात. मात्र यावेळी घरोघरी चालविल्या जाणाऱ्या या फुल गौरीलाही धार्मिक परंपरेनुसार तितकसं महत्त्व आहे. या गौरी






फुलाला कलंत्री फुल असे हि म्हटले जाते.


सदर, दींडीच्या झाड पानात गुंडाळून आणल्या जाणाऱ्या गौरी (कलंत्री) या महत्त्वाच्या फुलाबरोबर लवा, चेड्डा, कुड्डू , शिंदोळी फुल, आघाडा, माका या वनस्पती तर करमंदा, गोमिटी, छोटी शिंदोळी, उडीद, शिरी या वनस्पती वेळी या एकत्रितपणे आणल्या जात असून या गौरी फुल व सोबत असलेल्या पानं फुलं, वेळ या वनस्पती रानमाळावर व जंगल परिसरात शोधून काढावे लागते अशी माहिती शेतकरी शंकर मसणे यांनी दिली.

बाजारात या फुल गौरी विक्री साठी येत असून त्याची किंमत 20 ते 50 रुपयां पर्यंत असते. तसेच गांव-पाड्यात या गौरी (कलंत्री) फुल व सोबत एकत्रित असलेल्या इतर वनस्पती, वेळ या आणण्यासाठी गावातील काही ठराविक माहिती असलेल्या लोकांकडून उपलब्ध करून त्या घराबाहेर एखाद्या झाडा-झुडपांवर ठेवल्या जातात.

दरम्यान, या फुल गौरीचं आगमन ठरलेल्या मुहूर्त नुसार घरातील लहान मुलगा ज्याला गौरीचा भाऊ संबोधले जाते. हा भाऊ हि फुलांची गौर घेऊन दाराजवळ येतो, त्यानंतर ओवाळणी करून गौराईचं घरात प्रवेश होतो. चुना किंवा रंगांनी सजवलेल्या मातीच मडकं किंवा तांब्याच तपेला याला 'सुगर' या म्हटले जाणाऱ्या सुगरामध्ये तांदूळ टाकून बांबूच्या टोपलीत फुलांची गौरी व त्यामध्ये गौरी मातेचा फोटो ठेवून त्या सुगरावर टोपली ठेवून संपूर्ण घरात लाल माती किंवा गेरुंनी पट्टे ओढून त्यावर कुंकू व चुन्याच्या पावलांनी ठसे उमटवून या गौरी मातेला पावलांनी चालविले जाते व त्यानंतर स्वयंपाक घरात किंवा देवघरात ठेवून तिची पारंपरिक पद्धतीने पुजन केले जाते. त्याचबरोबर विसर्जन दिवशी या फुल गौरी मातेला ज्याच्या कडे शेती आहे ते आपल्या जुन्या पिढीनुसार पारंपरिक पद्धतीने शेतातील उभ्या भातपीकांमध्ये शिलवली (विसर्जित) केली जाते. तर काही भाविक गावानजीक असलेल्या ओहळ, नाला, नदी पात्रात विसर्जित करीत असल्याचे दिसून येते.

# पनवेल प्रारूप विकास आराखड्यावर सुमारे सहा हजार हरकती-सूचना

**पनवेल :** पनवेल महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्याबाबत सूचना व हरकतींसाठी ७ सप्टेंबर ही अंतिम तारीख जाहीर असल्याने शेवटच्या दिवसापर्यंत ६ हजार ३९३ हरकती व सूचना पालिका प्रशासनाकडे आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली. प्रारूप विकास आराखड्याविषयी हरकती नोंदविण्याची जमीन मालकांची वेळ संपली. काही राजकीय पक्षांनी हरकतींसाठी आणखी महिनाभराची अंतिम वेळ वाढविण्याची मागणी केली होती. परंतु पालिका अधिनियमामध्ये २००१ सालच्या जनगणनेनुसार पाच लाख लोकवस्तीची पालिका असल्याने ३० दिवसांपेक्षा अधिक मुदतवाढीची तरतूद नसल्याने ही मागणी मान्य पूर्ण होऊ शकली नाही. पनवेलच्या प्रारूप विकास आराखड्यात शेतजमिनींच्या मालकांना विकासक बनविण्याची संधी मिळाली




असल्याने सुरुवातीला १५ दिवस पालिकेच्या नगर रचना विभागाकडे हरकती व सूचना कमी प्रमाणात प्राप्त झाल्या. मात्र भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांनी गावनिहाय तसेच झोपडपट्टी भागांमध्ये बैठका घेतल्यानंतर शेतकऱ्यांसह अनेक गुंतवणूकदार आणि प्रत्येक झोपडपट्टीधारकांनी या प्रारूप विकास आराखड्यात त्यांचे मत नोंदविल्याचे समजते. लवकरच या सर्व हरकती व सूचना वेगवेगळ्या केल्यानंतर पालिकेने विकास आराखड्यात स्थापन केलेली समिती त्या हरकतींवर सुनावणी घेणार आहे. पनवेल पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी प्रारूप विकास आराखडा जाहीर केल्यानंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना माहिती देताना ज्या हरकतींवर खरंच सुधारणा करता येतील किंवा आराखड्याविषयी काही सकारात्मक सूचना असल्यास त्यावर समिती नक्की गांभीर्याने विचार करेल, असेही त्यावेळी आयुक्त चितळे यांनी स्पष्ट केले आहे.

# तळोजाची औद्योगिक स्मार्ट सिटीकडे वाटचाल

**पनवेल :** पनवेलमध्ये ८३ हजार कोटी रुपयांचा सेमीकंडक्टर प्रकल्प येणार असल्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. तसेच तळोजा औद्योगिक वसाहतीलासुद्धा स्मार्ट सिटीचा दर्जा मिळणार असल्याने येथील उद्योजकांनी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्र्यांच्या कार्यपद्धतीविषयी समाधान व्यक्त केले आहे. मागील अनेक वर्षांपासून येथील उद्योजकांकडून सुविधा पुरविण्याची मागणी सातत्याने केली जात होती.



राज्यातील सर्वात प्रगत औद्योगिक वसाहतीमध्ये तळोजाचा समावेश होतो. तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने (टीआयए) या परिसराला सुविधांसाठी वारंवार सरकारकडे पाठपुरावा केल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे.

स्मार्ट औद्योगिक वसाहतीमुळे तळोजा औद्योगिक क्षेत्रात तळोजा उपविभाग कार्यालय, स्मार्ट सेवा ऑपरेशन एमआयडीसीचे मुख्य कार्यालय आणि नियंत्रण कमांड सेंटर ऑपरेट आणि व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक कमांड आणि नियंत्रण कक्षाची स्थापना होणार आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उद्योग विभाग उभारणार आहे.

सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबरोबरच हवेतील प्रदूषणाचा गुणवत्ता दर्जा नियंत्रणाची यंत्रणा येथे उभारली जाईल. स्मार्ट पथदिवे, डिजिटल होर्डिंग, आपत्ती यंत्रणेअंतर्गत इमर्जन्सी कॉल बॉक्स आणि पब्लिक अॅड्रेस सिस्टीमसह स्मार्ट पोल यांसारख्या स्मार्ट घटकांची अंमलबजावणी उद्योग विभाग करणार आहे.

अद्यायावत यंत्रणेमधील सामूहिक माहिती संकलनाद्वारे स्मार्ट पाण्याचे मोजमाप केले जाणार आहे. सामायिक रासायनिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सीईटीपी) फेज १ आणि २ तसेच पंपिंग स्थानकाच्या आत येणाऱ्या व प्रक्रियेनंतर बाहेर पडणाऱ्या वाहिनीवर प्रवाही गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली आणि प्रवाह मापनाचे मोजमाप करणारी यंत्रणा बसविली जाणार आहे. याच प्रकल्पामध्ये तळोजा औद्योगिक क्षेत्रात वापर होत असलेल्या आणि मंजूर पाणी वापराबाबत सर्वेक्षण केले जाईल. अशाच पद्धतीने उद्योजकांकडून वापर होत असलेल्या ऊर्जा विभागाचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

# एसटी महामंडळाची बसगाडी मेट्रो खांबाला धडकली; आठ प्रवासी जखमी

**ठाणे :** घोडबंदर येथील ओवळा भागात मंगळवारी पहाटे राज्य परिवहन सेवेची (एसटी) बसगाडी मेट्रो मार्गिकेच्या खांबाला धडकली. या अपघातात चालक आणि वाहकासह आठ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. काही दिवसांपूर्वीच एसटी महामंडळाची



बसगाडी घोडबंदर येथील पातलीपाडा उड्डाणपूलाजवळील कठड्याला धडकली होती. त्यानंतर हा दुसरा अपघात असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आंबेजोगाई येथून बोरीवलीच्या दिशेने एसटी बसगाडी वाहतुक करत होती. त्यामध्ये वाहक आणि चालकासह एकूण १३ प्रवासी प्रवास करत होते. ही बसगाडी पहाटे ५.३० घोडबंदर येथील ओवळा नाका परिसरात आली असता, बसगाडीतील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बसगाडी मेट्रो मार्गिकेच्या खांबाला धडकली. या धडकेमध्ये बसगाडीच्या पुढील भागाचे नुकसान झाले. तर बसगाडीमधील १३ पैकी आठ प्रवासी जखमी झाले. या प्रवाशांना उपचारासाठी ब्रम्हांड आणि मानपाडा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जखमींची नावे

के. अडसूळ (चालक, वय- ३५), चाटे (वाहक), उद्धव चौरे (६५), उर्मिला चौरे (५५), सलीम शेख (५८), आत्मराम शेजुळ (४९), राजश्री शेजुळ (४२) आणि आकांक्षा शेजुळ (३५) अशी जखमींची नावे आहेत.



# दीपिका पादुकोण-रणवीर सिंग झाले आई-बाबा

## मुकेश अंबानींनी दोघांची रुग्णालयात घेतली भेट



बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री दीपिका पादुकोण व अभिनेता रणवीर सिंग आई-बाबा झाले आहेत. रविवारी (८ सप्टेंबरला) दीपिकाने मुंबईत गोंडस मुलीला जन्म दिला. लग्नानंतर सहा वर्षांनी या जोडप्याने आपल्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं. या दोघांवर सध्या शुभेच्छाचा वर्षाव होत आहेत. अशातच रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी यांनी रुग्णालयात या जोडप्याची भेट घेतली.

रणवीर व दीपिकाने शुक्रवारी सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले होते. दोघांचे कुटुंबीयही यावेळी त्यांच्यासोबत होते. त्यानंतर शनिवारी गणेश चतुर्थीच्या दिवशी तिला मुंबईतील एचएन रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथे तिने रविवारी ८ सप्टेंबरला मुलीला जन्म दिला. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून लेकीच्या जन्माबाबत माहिती दिली. त्यांच्या मुलीच्या जन्मानंतर सोशल मीडियावर दोघांवर सेलिब्रिटी व चाहते अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत. चाहते त्यांच्या मुलीसाठी नावं सुचवत आहेत. दीपिका अजुनही रुग्णालयातच आहे, अशातच मुकेश अंबानी यांनी त्यांची भेट घेतली. ते रुग्णालयात जात असतानाचा व्हिडीओ विरल भयानी या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे.

मुकेश अंबानी यांचा रुग्णालयात जातानाचा व्हिडीओ –

अंबानी कुटुंबीय व रणवीर-दीपिकाचे जवळचे संबंध आहेत. अंबानी कुटुंबाच्या प्रत्येक कार्यक्रमाला दीपिका व रणवीर हजेरी लावत असतात. मुकेश अंबानी यांचा धाकटा मुलगा अनंत अंबानीच्या लग्नात व रिसेप्शनमध्ये दीपिकाने रणवीरसह हजेरी लावली होती. तर रणवीर अनंत-राधिकाच्या दोन्ही प्री-वेडिंग, नंतर हळदी समारंभापासून ते लग्न, आशीर्वाद समारंभ आणि रिसेप्शन सोहळ्याला उपस्थित होता. रणवीरने अनंत-राधिकाच्या हळदी समारंभात खूप धमाल केली होती.

दीपिकाला गणेश चतुर्थीच्या दिवशी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यादिवशी अंबानी कुटुंबाकडे बाप्पाचे आगमन झाले. दीपिका रुग्णालयात होती व रणवीर तिच्याबरोबर होता, त्यामुळे रणवीर व दीपिकाचे दोघांचेही वडील म्हणजेच दोन्ही व्याही अंबानींच्या घरी गणरायाच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला गेले होते.

# ज्येष्ठ हास्य कलाकार दिलीप हल्याळ यांचे निधन



नाटक, चित्रपट, मालिका आणि एकपात्री अशा विविध माध्यमांतून गेली पन्नासहून अधिक वर्षे रसिकांचे मनोरंजन करणारे ज्येष्ठ हास्य कलाकार दिलीप हल्याळ (वय ६५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने मंगळवारी पहाटे निधन झाले. त्यांच्यामागे आई, पत्नी, दोन विवाहित कन्या, जावई असा परिवार आहे. 'बंपर लाफ्टर' आणि 'नजराणा हास्याचा' या एकपात्री, द्विपात्री कार्यक्रमातून त्यांनी रसिकांना हसविले. एकपात्री कलाकार परिषदेचे ते माजी अध्यक्ष होते.

'कथा अकलेच्या कांद्याची', 'सौजन्याची ऐशी तैशी', 'करायला गेलो एक', 'माणसं अशी वागतात का?' अशा विविध नाटकांचे त्यांनी नऊ हजारांहून अधिक प्रयोग केले होते. 'दोघी', 'शुभमंगल सावधान', 'बाबा लगीन', 'जाऊ तिथे खाऊ', 'नऊ महिने नऊ दिवस' या चित्रपटांसह 'टोकन नंबर वन', 'मॅडम', 'फिरकी', 'दैवचक्र' या मालिकांतून त्यांनी भूमिका केल्या होत्या. संगीत कार्यक्रमांचे रंगतदारपणे सूत्रसंचालन करण्यात त्यांचा हातखंडा होता. 'भारत संचार निगम लिमिटेड'मधून (बीएसएनएल) ते सेवानिवृत्त झाले होते.

# ऐश्वर्या राय-बच्चनने आई आणि लेकीसह GSBच्या बाप्पाचं घेतलं दर्शन



गणेशोत्सवामुळे सध्या सर्वत्र भक्तीमय वातावरण पाहायला मिळत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही जल्लोषात गणेशोत्सव साजरा होत आहे. सेलिब्रिटी मंडळी देखील धुमधडाक्यात हा सण साजरा करताना दिसत आहेत. तसंच सेलिब्रिटी लोकप्रिय मंडळातील बाप्पाचं दर्शन घेताना पाहायला मिळत आहेत. नुकतंच अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चनने आई आणि लेकीसह जीएसबीच्या बाप्पाचं दर्शन घेतलं. याचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत.

जीएसबीच्या बाप्पाचं दर्शन घेतल्यानंतरचे ऐश्वर्या राय-बच्चनचे व्हिडीओ 'फिल्मी ग्यान' आणि 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आले आहेत. या व्हिडीओमध्ये, ऐश्वर्या आपली आई वृंदा राय आणि आराध्याला सांभाळत गर्दीतून बाहेर जाताना पाहायला मिळत आहे. यावेळी ऐश्वर्या साध्या लूकमध्ये दिसली. तिने फिकट गुलाबी आणि पांढऱ्या रंगाचा ड्रेस परिधान केला होता. तर तिची आई गुलाबी रंगाच्या साडीत पाहायला मिळाली. तसंच आराध्या पिवळ्या रंगाच्या ड्रेसमध्ये खूप सुंदर दिसत होती. या तिघींचा व्हिडीओ सध्या खूप चर्चेत आला आहे. पण या व्हिडीओमुळे पुन्हा एकदा ऐश्वर्या व अभिषेक घटस्फोटाच्या चर्चांना उधाण आलं आहे.

# जान्हवीच्या गळ्यात निक्कीचा फोटो, तर अरबाजकडे...; 'बिग बॉस'च्या घरात अनोखा नॉमिनेशन टास्क




'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या सीझनचा सातवा आठवडा आजपासून सुरू होणार आहे. घरात नुकतीच एक वाइल्ड कार्ड एन्ट्री झाली आहे. संग्राम चौगुले नुकताच घरात आल्याने तो काय रणनीती आखणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे. अशातच आता घरात सातव्या आठवड्याचा नॉमिनेशन टास्क पार पडणार आहे.यंदाचा नॉमिनेशन टास्क 'बिग बॉस'ने अनोख्या पद्धतीने डिझाइन केला आहे. नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोमध्ये सगळ्या स्पर्धकांच्या गळ्यात एकमेकांचे फोटो दिसत आहेत. त्यामुळे आता या आठवड्यात घराबाहेर होण्यासाठी नॉमिनेट कोण होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. अभिजीत सुरुवातीलाच अंकिता आणि डीपीला म्हणतो, "काही झालं तरी आपण चार जण सेफ झालं पाहिजे." या सदस्यांना बझर वाजल्यावर जादुई दिव्याजवळ सर्वात आधी पोहोचणं गरजेचं आहे. एकंदर हा जादुई दिवा या नॉमिनेशन कार्यात निर्णायक भूमिका बजावणार आहे. नॉमिनेशन टास्कमध्ये फोटो खालीलप्रमाणे देण्यात आले आहेत...

अंकिता – जान्हवीचा फोटो
धनंजय – अभिजीतचा फोटो
वर्षा उसगांवकर – धनंजयचा फोटो
अभिजीत – आर्याचा फोटो
आर्या – वैभव चव्हाणचा फोटो
वैभव चव्हाण – अंकिताचा फोटो
पॅडी – अरबाजचा फोटो
जान्हवी – निक्कीचा फोटो
निक्की – पॅडीचा फोटो
अरबाज – वर्षा उसगांवकर यांचा फोटो

'कलर्स वाहिनी'ने शेअर केलेल्या प्रोमोमध्ये घरातील सगळे सदस्य नॉमिनेशनपासून सुटका करून घेण्यासाठी एकमेकांची मनधरणी करत असल्याचं पाहायला मिळत आहे.

वर्षा यांचा फोटो अरबाजकडे असल्याने त्या सुरुवातीला त्याच्याशी संवाद साधत नॉमिनेट करू नकोस असं त्याला सांगत असल्याचं पाहायला मिळतं. मात्र, अरबाजने वर्षा यांना नॉमिनेट केलं असण्याची दाट शक्यता आहे. याचं मुख्य कारण, म्हणजे सगळे सदस्य एका ओळीत उभे असताना अरबाजच्या गळ्यात कोणाचाही फोटो नव्हता. याचा अर्थ त्याने वर्षा यांचा फोटो नॉमिनेशनला दिला असल्याचं स्पष्ट होत आहे. दरम्यान, नॉमिनेशन टास्कमध्ये अंकिता आणि जान्हवीमध्ये देखील वाद होणार आहेत.

## दिनविशेष

**घटना**

२००७ : रशियाने सगळयात मोठ्या बॉम्बची चाचणी केली. याचे नाव सगळ्या बॉम्बचा बाप असे ठेवण्यात आले आहे.
२००१: वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतींमध्ये दहशतवाद्यांनी दोन प्रवासी विमाने घुसवून केलेल्या हल्ल्यात हजारो लोक मृत्युमुखी..
१९९७: नासाचे मार्सग्लोबल सर्व्हेयर हे अंतराळयान मंगळावर पोहोचले.
१९७२: नाट्यमंदार निर्मित आणि प्रा. मधुकर तोरडमल लिखित व दिग्दर्शित तरुण तुर्क, म्हातारे अर्क या नाटकाचा पहिला प्रयोग इचलकरंजी येथील डेक्कन स्पिनिंग मिलच्या गणेशोत्सवात झाला.
१९६५: भारतीय सैन्याने लाहोर जवळील बुर्की गाव ताब्यात घेतले.
१९६१ : विश्व प्रकृती निधी (World Wildlife Fund) ची स्थापना.
१९४४: दुसरे महायुद्ध - रॉयल एअर फोर्सने डार्मश्टाट शहरावर केलेल्या बॉम्बफेकीमुळे ११,५०० नागरिक ठार.
१९४२: आझाद हिंद सेनेने जन गण मन राष्ट्रगीत म्हणून गायले.
१९४१: अमेरिकेने पेंटागॉन बांधायला सुरुवात केली.

**जन्म**

१९८२ : श्रीया शरण- तामिळ चित्रपट अभिनेत्री
१९७६: मुरली कार्तिक- भारतीय क्रिकेटर
१९३९ : चार्ल्स गेशेके ॲडॉब सिस्टमचे संस्थापक
१९१७: फर्डिनांड मार्कोस - फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष (निधन २८ सप्टेंबर १९८९ )
१९१५: पुपुल जयकर - सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (निधन: २९ मार्च १९९७)
१९१२: अप्पासाहेब पंत - भारतीय मुत्सद्दी आणि स्वातंत्र्य सेनानी - पद्मश्री (निधन: ५ ऑक्टोबर १९९२)
१९११ : लाला अमरनाथ भारद्वाज स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार पद्म भूषण (निधन: ५ ऑगस्ट २०००)
१९०१: कवी अनिल - ४० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (निधन: ८ मे १९८२)

**मृत्यू**

२०२२ : कृष्णम राजू - भारतीय अभिनेते आणि खासदार (जन्म: २० जानेवारी १९४०)
२०२२: स्वामी स्वरूपानंद सरस्वती भारतीय धार्मिक गुरू आणि शंकराचार्य (जन्म: २ सप्टेंबर १९२४)
२०२० : टोनी ओपाथा श्रीलंकेचे क्रिकेटर (जन्म: ५ ऑगस्ट १९४७)
२०२० : अग्निवेश - भारतीय तत्त्वज्ञानी, शैक्षणिक आणि राजकारणी (जन्म: २१ सप्टेंबर १९३९)
२०१५ : जसवंत सिंग नेकी भारतीय कवी आणि अभ्यासक (जन्म: २७ ऑगस्ट १९२५)
२०११ : अंजली गुप्ता - भारतीय सैनिक व पायलट
१९९८ : एन. डी. नगरवाला - क्रिकेटपटू आणि क्रीडा महर्षी (जन्म: १० ऑक्टोबर १९०९)
१९९३ : अभी भट्टाचार्य - भारतीय अभिनेते

# पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात फ्रिट्झचा सरळ सेटमध्ये पराभव



जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असणाऱ्या इटलीच्या यानिक सिन्नेरने अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झला सरळ सेटमध्ये पराभूत करत अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीचे जेतेपद पटकावले. सिन्नेरने अंतिम सामन्यात १२व्या मानांकित फ्रिट्झवर ६-३, ६-४, ७-५ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. फ्रिट्झच्या पराभवामुळे अमेरिकन टेनिस स्पर्धेचे जेतेपद मिळवण्यासाठीची अमेरिकन खेळाडूची प्रतीक्षा अजून लांबली आहे. अँडी रॉडिकने अमेरिकेचा अखेरचा खेळाडू होता, ज्याने या स्पर्धेच्या पुरुष एकेरीचे जेतेपद मिळवले. रॉडिकने २००३ मध्ये हे जेतेपद पटकावले होते. फ्रिट्झ प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंत पोहोचला होता. सिन्नेरसमोर फ्रिट्झला अंतिम लढतीत कामगिरी उंचावता आली नाही. सिन्नेरने सामन्याच्या सुरुवातीचे पहिले दोन सेट जिंकत आघाडी घेतली. फ्रिट्झने तिसऱ्या सेटमध्ये सिन्नेरसमोर आव्हान उपस्थित केले.

# पाठदुखीची समस्या पाठ सोडत नाही? डॉक्टरांचं ऐका आणि 'हे' पदार्थ पूर्णत: बंद करा

दिवसभराच्या बैठ्या कामांनी अनेकदा आपली पाठ अवघडते. लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर काम असल्याने बसून काम करण्याशिवाय पर्याय नसतो. सकाळी लवकर उठून-आवरून आपण जे कामाला सुरुवात करतो, ते संध्याकाळ आणि रात्र कधी होते तेही कळत नाही. रात्री आपण पाठ टेकतो तेव्हाच काय तो पाठीला आराम मिळतो. त्यात पाठदुखी ही कोणत्याही वयातील व्यक्तीसाठी समस्या बनू शकते. तुम्हालाही पाठीत हलके दुखणे सतत होत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करण्याऐवजी त्यावर वेळीच उपचार करा. एकाच आसनात बराच वेळ बसल्याने पाठदुखी होते. पण, जर ही समस्या तुम्हाला बराच काळ त्रास देत असेल तर थोडी काळजी घ्या. कारण- ही गंभीर आजाराची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. त्यामुळे तुम्हाला जर पाठदुखीची समस्या असेल, तर काही पदार्थांपासून तुम्ही दूर राहणे गरजेचे आहे.

हे पदार्थ नेमके कोणते ते जाणून घेऊ. फिटनेस व पोषण शास्त्रज्ञ आणि फूड दरझीचे सह-संस्थापक डॉ. सिद्धांत भार्गव यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. ज्यांना पाठदुखीची समस्या आहे त्यांनी साखर, साखरयुक्त सिरप, मका आणि तेल याचा आहारात समावेश करू नये. नैसर्गिक वा प्रक्रिया न केलेला मका हा आरोग्यदायी असला तरी प्रक्रियेदरम्यान त्यातील पोषक तत्त्वे निघून जातात आणि त्याचा आपल्या शरीरावर वेगळा परिणाम होतो. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या आहारात मक्याचा समावेश करीत असाल, तर तो प्रक्रिया केलेला नसावा. प्रक्रिया केलेला मका खाल्ल्यानं पाठीच्या खालच्या वेदना वाढू शकतात.



डॉ. सिद्धांत भार्गव यांच्या मते, "प्रक्रिया केलेल्या मक्यामुळे इन्सुलिनच्या पातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते आणि त्यामुळे जळजळ आणि वजन वाढू शकते. जास्त वजनामुळे मणक्यावर अतिरिक्त ताण पडतो आणि पाठीच्या खालच्या भागात दुखणे वाढते." तसेच यामुळे जळजळ बरे होण्याची प्रक्रिया मंद होऊ शकते आणि पाठीच्या खालच्या भागात दुखण्यासारखी परिस्थिती वाढू शकते.

"मक्यामध्ये बी जीवनसत्त्व आणि खनिजे, तसेच फायबर असते; मध्यम प्रमाणात सेवन केल्यास एकूण आरोग्यासाठी हे घटक चांगले असू शकतात. संपूर्ण मक्यामध्ये अँटिऑक्सिडंट्सदेखील असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास मदत करतात." डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार दाहकविरोधी आहारामुळे पाठदुखी कमी होण्यास मदत होते. भरपूर फळे आणि भाज्या खाणे आवश्यक आहे.

## राशि भविष्य

**मेष** – आजच्या दिवशी तुम्ही चैतन्याने भारले असलात तरी तुमच्याबरोबर असायला हवी अशा व्यक्तीची कमतरता तुम्हाला नक्कीच जाणवेल. जे लोक आत्तापर्यंत पैसा विनाकारण खर्च करत होते आज त्यांना समजेल की, पैश्याची आयुष्यात किती आवश्यकता आहे कारण, आज अचानक तुम्हाला पैश्याची आवश्यकता असू शकते आणि तुमच्या जवळ पर्याप्त धन नसेल.

**वृषभ** – इतरांच्या गरजा तुमच्या इच्छेच्या आड येतील परंतु त्यामध्ये तुमची काळजी हाच भाग असेल. - तुमच्या भावनांना रोखू नका आणि आराम वाटण्यासाठी तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी करा. जर तुम्ही कुणाकडून आपली उधारी माघात असाल आणि तो काही कारणास्तव तुमच्या गोष्टीला टाळत असेल तर, आज तो न बोलता तुम्हाला पैसे परत करेल.

**मिथुन** – सोशलाईज होण्याची चिंता भीती तुम्हाला उदास करेल. तुमच्या आत्मसन्मानाला प्रोत्साहन देऊन ही चिंता नाहिशी करा. शंकास्पद आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतले जाणार नाही याची काळजी घ्या. मुलांच्या बक्षिस समारंभाचे आमंत्रण हा तुमच्यासाठी आनंदाचा मार्ग ठरु शकतो.

**कर्क** – आरोग्य एकदम चोख असेल. तुमच्या अवास्तव नियोजनामुळे निधीची कमतरता भासेल. जवळच्या मित्रांचे आणि जोडीदारांचे आक्षेपार्ह कृत्य तुमचे आयुष्य खडतर करु शकते. अनोखा नवा रोमान्स तुमचा उत्साह वाढवणारा आणि तुमचा मूड उल्हसित करणारा असेल.

**सिंह** – दिवसाची सुरवात तुम्ही योग साधनेने करू शकतात. असे करणे तुमच्यासाठी फायदेशीर असेल आणि पूर्ण दिवस तुमच्यात ऊर्जा राहील. तुमची कलात्मक बुद्धिमत्ता नीट वापरली तर खूप फायदेशीर ठरेल. कुटुंबियांच्या गरजांना प्राथमिकता द्या. त्यांच्याबरोबर आनंदी आणि दु:खी प्रसंगात सामील व्हा, तुम्ही त्यांची काळजी करता हे त्यांना कळू शकेल.

**कन्या** – आज तुम्ही ऊर्जेने भरपूर असाल - तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला गरजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील. आपल्या जीवनसाथी बरोबर चित्रपट पाहणे अथवा रात्रीचे जेवण करणे तुम्हाल शांतता, आराम मिळवून देईल आणि तुमचा मूड एकदम बहारदार राहील.

**तूळ** – स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. आर्थिक स्थितीतील बदल हे नक्कीच होणार आहेत. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा. एकटेपणा आणि उदासीनतेच्या भावनेमुळे दडपणाखाली असलेल्या पालकांना थोडे बरे वाटेल.

**वृश्चिक** – आरोग्याच्या भल्यासाठी उगा त्रागा करु नका. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे कारण, तुमच्या द्वारे दिले गेलेले धन आज तुम्हाला परत मिळू शकते. अल्प परिचित लोकांशी तुमच्या खाजगी गोष्टी बोलू नका. एखाद्या सहलीच्या ठिकाणी जाऊन तुमच्या प्रेमी जीवनात आनंद आणाल.

**धनु** – तुम्ही संपूर्ण आराम करायला हवा अन्यथा थकव्यामुळे तुमच्या निराशावादी दृष्टिकोन कार्यरत होऊ शकतो. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. तुमच्या ओळखीच्या व्यक्तीला तुम्हाला योग्य वाटेल तो निर्णय घेण्यासाठी जबरदस्ती केलीत

**मकर** – पत्नी तुम्हाला आनंदी करील. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे कारण, तुमच्या द्वारे दिले गेलेले धन आज तुम्हाला परत मिळू शकते. आपल्या जोडीदाराबरोबर घरगुती प्रलंबित कामे संपविण्यासाठी योग्य ती व्यवस्था करा.

**कुंभ** – धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्ही इतरांवर अतिखर्च करण्यासाठी पुढाकार घ्याल. वैयक्तिक प्रश्न सोडविण्यासाठी मित्र आपल्या सल्ल्याची अपेक्षा धरतील. तुमच्या नात्यातल्या सगळया तक्रारी आज निघून जातील.

**मीन** – तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय. त्यामुळे शंका, निरुत्साह, अश्रद्धा, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल. काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल.

# पुण्यात गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचाच 'आव्वाज'! कमाल मर्यादा पातळीचा सर्वत्र भंग; दोनशे मंडळांच्या ठिकाणी तपासणी

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांत शहरात सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीने ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा ओलांडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोजण्यात आलेल्या ध्वनिपातळीतून हे स्पष्ट झाले आहे. यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजली जात आहे. हे काम एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे. या संस्थेने राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या साह्याने ध्वनिप्रदूषण पातळी मोजण्यास सुरुवात केली आहे. दररोज सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही पातळी मोजली जाते. ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा पातळी दिवसा ७५ डेसिबल आणि रात्री ७० डेसिबलपर्यंत आहे. शहरात सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी ७५ ते ८५ डेसिबलदरम्यान नोंदविण्यात आली आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात शहरभर ध्वनिप्रदूषण होत



असल्याची बाब उघडकीस आली आहे. गणेशोत्सवातील वाढत्या ध्वनिप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कल्याणी मांडके यांनी लवादाकडे याचिका दाखल केली होती. यात राज्य सरकार, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महापालिका आणि पुणे पोलिसांना प्रतिवादी करण्यात आले होते. पुण्यात गणेशोत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. यावर महाराष्ट्र प्रदूषण मंडळासह पुणे पोलिसांना ध्वनिप्रदूषण कमी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. प्रत्येक गणेश मंडळाला १०० वॉटपेक्षा जास्त क्षमतेचे ध्वनिक्षेपक लावण्यास राष्ट्रीय हरित लवादाने बंदी घातली आणि ढोल-ताशा पथकात ३० पेक्षा जास्त वादकांचा समावेश करण्यास मनाई केली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आवाजाची पातळी तपासली जात आहे. ही पातळी जास्त असल्यास पोलिसांशी संपर्क साधून गणेश मंडळाला आवाज कमी करण्याच्या सूचना केल्या जात आहेत. ढोल-ताशा पथकात ३० पेक्षा जास्त वादक नसावेत, या नियमाची अंमलबजावणी पोलिसांकडे सोपविण्यात आली आहे. जगन्नाथ साळुंके, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## मुलुंडमध्ये पस्तीस किलो साबुदाण्यापासून गणपतीची रांगोळी



**मुंबई** – मुलुंड मधील प्रसिध्द गणेश मूर्तीकार मोहनकुमार दोडेचा यांनी यावर्षी देखील पस्तीस किलो साबुदाण्यापासून गणपतीची रांगोळी साकारली आहे. पाच फूट रुंद आणि सहा फूट लांब अशी ही रांगोळी असून १४ सप्टेंबरपासून ती नागरिकांना पाहता येणार आहे.दोडेचा यांनी १९६१ पासून आशा प्रकारच्या रांगोळया तयार करण्यास सुरुवात केली. त्यांनी तयार केलेली रांगोळी पाहण्यासाठी दरवर्षी हजारोंच्या संख्येने नागरिक येतात. या सागो रांगोळीची आंतरराष्ट्रीय गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्स, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. यावर्षी देखील त्यांनी पाच फूट रुंद आणि सहा फुट लांब अशी ही रांगोळी तयार केली असून ३५ किलो साबुदाणे वापरले आहेत. महिन्याभरापूर्वी त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने या रांगोळीला सुरुवात केली असून रोज १२ ते १५ तास ते या रंगोळीवर काम करत आहेत. सध्या या रांगोळीचे काम अंतिम टप्प्यात आहे. १४ सप्टेंबर २०२४ पासून २२ सप्टेंबर २०२४ पर्यंत ही रांगोळी मुलुंडच्या आझाद भवन येथे पाहता येणार आहे.

## मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तुटपुंजी मदत नाही, तर पंचनामा करून मदत करावी

### वंजारी सेवा संघ युवा प्रदेश सरचिटणीस अमोल धनराज केंद्रे..



**मराठवाडा** - जय महाराष्ट्र बोलल्या नंतर अखंड महाराष्ट्राचे चित्र डोळयासमोर उभे राहते.रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर इतर थोर महापुरुष, प्राणांची आहुती देणारे स्वातंत्र्य सैनिक,क्रांतिकारी यांची आठवण येते.भारत देशाचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होवूनही गेला.महाराष्ट्र राज्याचा देशाला हेवा वाटेल असे राज्य घडवण्याचे कार्य शेतकरी कष्टकरी यांच्या माध्यमातून गाव खेड्यातून सुरू होते.तुमचे आमचे अन्नदाते शेतकरी आहेत हेही विसरून चालणार नाही.हे सत्य नाकारता येणार नाही.शेतकऱ्यांच्या समस्या सोडवल्या पाहिजेत.त्यांची कर्ज माफी करावी.गेल्या पाच दिवसात मराठवाड्यात अतिवृष्टी मुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे.सरकार मदत करते पण ती मदत तुटपुंजी असते.सरकारने तुटपुंजी मदत न करता.पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी. शेतकऱ्यांच्या समस्या तात्काळ सोडवाव्यात.

तसेच गाव, खेड्या, वस्ती, शेती पर्यंत रस्ते बनवले गेले पाहिजेत. आजही अनेक भागात दळण वळण साधन नाही. ज्या ठिकाणी लाल परी जाते. त्या ठिकाणी माता, माऊली, वडीलधारे,विद्यार्थी कुठे तरी झाडाच्या खाली उभे राहून बसची वाट पाहतात.याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.यासाठी प्रत्येक गाव तिथे बस थांबा असलेल्या ठिकाणी प्रवाशी शेड आसन व्यवस्था करण्यात यावी.जेणे करून उन्हाळयात,पावसाळयात त्या ठिकाणी माता, माऊली, वडीलधारे, विद्यार्थी, प्रवाशी यांना, निवारा मिळेल.

सर्वात महत्वाचे म्हणजे आजही अनेक गाव खेड्यात अंतिम संस्कार रस्त्यावर, शेतात, नदीच्या बाजूला केले जातात. यासाठी प्रत्येक ठिकाणी गाव तिथे समशान भूमी बांधण्यात यावी. तसेच मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पंचनामा करून तात्काळ मदत द्यावी.यासाठी वंजारी सेवा संघ युवा प्रदेश सरचिटणीस,धडाकेबाज युवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्री अमोल धनराज केंद्रे यांनी मंत्रालय मुंबई येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार साहेबांच्या कडे मागणी केली आहे.

## नांदेड विद्यापीठाने लावला शाकाहारी चामडीचा शोध; नेमकं काय आहे विगन लेदर?




**नांदेड :** स्वामी रामानंद विद्यापीठाने वेगन लेदरचा शोध लावला आहे. विज्ञान शाखेतील डॉ. ओमप्रकाश येमुल यांनी हा शोध लावला आहे. या वेगन लेदरमुळे उद्योग क्षेत्रात परिवर्तन होऊ शकते. हा शोध उद्योग क्षेत्रात नवीन संधी निर्माण करण्यासाठी महत्वाचे ठरणार आहे.

या वेगन लेदरमुळे आंतराष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधून घेण्यात नांदेड विद्यापीठ यशस्वी ठरलं आहे. या संशोधनाचे महत्व केवळ आर्थिक प्रभावामध्येच नाही तर पर्यावरणीय परिणाममध्ये आहे, जे पारंपरिक लेदर निर्मितीच्या तुलनेत एक शाश्वत पर्याय प्रदान करते.

डॉ. येमूल आणि त्यांच्या टीमने विकसित केलेले वेगन लेदर हे पारंपरिक लेदरच्या तुलनेत पर्यावरणपूरक पर्याय आहे. पारंपरिक लेदर निर्मिती अनेक पर्यावरणीय आणि नैतिक समस्यांशी जोडलेली आहे. त्यामध्ये जंगलतोड, जलप्रदूषण आणि प्राण्यांवरील क्रूरतेचा समावेश आहे. याउलट वेगन लेदर हे शाश्वत, वनस्पती आधारित सामग्रीपासून बनवले जाते. ते पर्यावरणीय परिणाम कमी करते आणि प्राण्यांच्या लेदरसारखेच लुक आणि फील प्रदान करते.

## सोलापुरात संशयास्पद ९६ बांधकाम परवान्यांची होणार फेरपडताळणी, बेकायदा बांधकामांच्या चौकशीची मागणी



**सोलापूर :** सोलापूर महापालिकेत कायदा धाब्यावर बसवून बांधकाम परवाने दिल्याच्या प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल झालेल्या संबंधित चार अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून ९६ बांधकाम परवान्यांचे वाटप झाल्याचे चौकशीत आढळून आले आहे. या सर्व बांधकाम परवान्यांची फेरपडताळणी होणार आहे. नव्या पेठेसारख्या मोक्याच्या आणि प्रचंड वर्दळीच्या बाजारपेठेतही नियमबाह्य बांधकामे झाली आहेत. त्याचीही सखोल चौकशी होण्याची मागणी पुढे येत आहे.

महापालिकेत बांधकाम परवाना विभागामध्ये ऑनलाइन बांधकाम परवाने मंजूर करणे बंधनकारक आहे. परंतु सहायक अभियंता झाकीरहुसेन नाईकवाडी, कनिष्ठ अभियंता श्रीकांत खानापुरे, अवेक्षक आनंद क्षीरसागर आणि शिवशंकर घाटे या चौघाजणांनी कायदेशीर अधिकार नसताना ऑफलाइन पद्धतीने बांधकाम परवाने मंजूर केल्याचे माहिती अधिकारात मिळविलेल्या माहितीतून उघड झाले होते. याबाबत महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांना दखल घ्यावी लागली. दरम्यानच्या काळात नगर अभियंता पदावर कार्यरत असलेले लक्ष्मण चलवादी यांनी घेतलेली स्वेच्छानिवृत्ती आजही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यांचीही सखोल चौकशी होणे अपेक्षित असल्याचे पालिका वर्तुळात बोलले जाते.

या प्रकरणात नाईकवाडी, खानापुरे, क्षीरसागर व घाटे यांना काही महिन्यांपूर्वी प्राथमिक चौकशीअंती निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल झाला होता. या बांधकाम परवाना घोटाळयाशी संबंधित अधिकाऱ्यांकडून ९६ मिळकतदारांना बांधकाम परवाने मंजूर करण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे या सर्व बांधकाम परवान्यांची फेरपडताळणी होणार आहे. या सर्व संबंधित मिळकतदारांनी पंधरा दिवसात बांधकाम परवान्याशी संबंधित सर्व मूळ कागदपत्रे पालिका बांधकाम परवाना विभागात सादर करावी. अन्यथा, त्यांचे बांधकाम परवाने रद्द होतील, असा इशारा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिला आहे. उत्तर कसबा, तेलंगी पाच्छा पेठ, रेल्वेलाइन, कसबे सोलापूर, मजरेवाडी परिसर आदी भागातील बांधकाम परवान्यांशी संबंधित असलेल्या या प्रकरणात पालिकेच्या काही निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह बांधकाम व्यावसायिक आणि विकासकांचा समावेश आहे. हे बांधकाम परवाने फेरपडताळणीत बेकायदेशीर आढळून आल्यास या सर्व संबंधितांसह मिळकतदार आणि कर्ज देणाऱ्या बँकाही अडचणीत येणार आहेत.

नव्या पेठ व गोल्डफिंच पेठेसारख्या शहराच्या मध्यवस्तीतील, मोक्याच्या बाजारपेठेत अलीकडे समोरील जागा सोडून बांधकामे न करता झालेली बांधकामे समोरील जागेवरही केली गेली आहेत. त्याबाबत माहितीच्या अधिकाराखाली विचारलेल्या माहितीवरून या बाबी उजेडात आल्या आहेत. परंतु ही रस्त्यावर खेटून उभारलेली बांधकामे पालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पाडली गेली नाहीत.


## India's 'strongest team ever' heading to Budapest itching for gold medal



India's Olympiad side Vidit Gujrathi, Gukesh, R Praggnanandhaa, Arjun Erigaisi and Pentala Harikrishna along with Viswanathan Anand at the draw of the Tata Steel Chess India tournament in Kolkata in September 2023. (Express photo by Partha Paul)Vidit Gujrathi, Gukesh, R Praggnanandhaa, Arjun Erigaisi and Pentala Harikrishna along with Viswanathan Anand at the draw of the Tata Steel Chess India tournament in Kolkata in September 2023. (Express photo by Partha Paul) India's chess Avengers are assembling in Budapest. Their mission: to win the gold medal at the Chess Olympiad, the most prestigious team competition in the sport.An Indian team had won gold at the Olympiad before: but that was a shared one with Russia at the 2020 Online Chess Olympiad, where there was a different format used. India also has bronze medals from their campaigns in 2014 and 2022.At the 2022 Olympiad in India, players like D Gukesh left their mark. But the 2024 Olympiad in Hungary's capital could just be the coming-of-age event on the chessboard that India has been awaiting. "This is certainly the strongest team India has ever sent to an Olympiad. They have a pretty decent chance of winning the gold, and a fair chance of winning a medal. Although this is the same team that India sent to the 2023 Asian Games (where they won silver), I think everyone has certainly become stronger in the last one year," Srinath Narayanan, the captain of the Indian team, told one of the English newspaper.

## Delhi govt plans to build two new ISBTs at Tikri Border, Narela

**Delhi** - To decongest the overcrowded Ring Road and the area around the ISBT Kashmere Gate, the Delhi government is planning to construct two new inter-state bus terminals (ISBTs) in Outer Delhi's Tikri Border and Narela, officials said on Monday.



Apart from the decongestion and reduction of burden on the existing ISBT, the transport department's key aim behind developing the two ISBTs is to curb vehicular pollution. "A large number of buses coming from neighbouring states are BS IV or diesel-fuelled buses. Delhi is shifting towards electric vehicles and all the old buses are CNG buses but the neighbouring cities are yet to convert to CNG and electric... So, If a new ISBT is developed in the outer part of the city, these buses will not enter the city," said an official. said the ISBT at Tikri Border will be developed on a land of 29,500 sq m. "The proposal was approved by the transport minister last month... The land is under PWD, so the transport department has written to the department seeking to acquire it," said the official.

## Bridge connecting Coastal Road with Sea Link to be opened partially from Sept 12



**Mumbai** - The 'bow-string' arch bridge connecting the Mumbai Coastal Road with the Bandra Worli Sea Link (BWSL) is scheduled to open partially from September 12, as announced by the Brihanmumbai Municipal Corporation (BMC). Currently, the Coastal Road is operational only up to Worli. Civic officials have stated that vehicles will be permitted to use the new connector from September 12 morning. However, there will be no formal inauguration event. This new connector will provide direct access for northbound vehicles to the Bandra Worli Sea Link, eliminating the need to exit at the Worli interchange. Also Read | Mumbai's second twin tunnel for coastal road to pass under rivers, mangroves "Northbound vehicles will be able to directly enter the Sea Link from the Coastal Road. However, southbound vehicles traveling towards Nariman Point will continue to use the existing entry points at Worli and Haji Ali," the official explained.


## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेस केडीएमसीमध्ये युवा युवतींचा भरघोस प्रतिसाद

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाने "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" सन २४-२५ या अर्थिक वर्षापासून सुरु केलेली आहे. या योजनेसाठी शासन निर्णयाच्या अनुषंगाने अस्थापनेवरील मंजूर पदांच्या ५ टक्के म्हणजे एकूण 323 विविध पदासाठीचे उद्दीष्ट कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस दिले असून त्यामध्ये प्रामुख्याने लिपीक, स्टाफ नर्स, कनिष्ठ अभियंता, डाटा ऐन्ट्री ऑपरेटर, विधी अधिकारी, स्वच्छता निरिक्षक, वायरमन, कनिष्ठ अभियंता(यांत्रिकी), कनिष्ठ अभियंता(विदयुत), सुरक्षा रक्षक, वार्डबॉय, आया, शिपाई इ. विविध पदांचा अंतर्भाव आहे.

# धारावी पुनर्विकासाचे भूमिपूजन धारावीकर उधळणार

## उद्यापासून धारावीकरांचे साखळी उपोषण

● मुंबई, (प्रतिनिधी) :



धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडने (डीआरपीपीएल) धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाच्या भूमिपूजनाचा घाट घातला आहे. भूमिपूजनाबाबतची कोणतीही अधिकृत घोषणा डीआरपीपीएलकडून करण्यात आली नाही. मात्र १२ सप्टेंबर रोजी भूमिपूजन करण्यात येणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. डीआरपीपीएलचा भूमिपूजनाचा घाट उधळून लावण्याचा इशारा धारावी बचाव आंदोलनाने दिला आहे. या भूमिपूजन सोहळयाला विरोध करण्यासाठी धारावी बचाव आंदोलनाकडून बुधवारी साखळी उपोषण करण्यात येणार आहे. या उपोषणात शेकडो धारावीकर सहभागी होणार असून यावेळी स्थानिक खासदार अनिल देसाई आणि खासदार वर्षा गायकवाड उपस्थित राहणार आहेत. धारावी पुनर्विकासेच कंत्राट अदानी समुहाला देण्यात आले आहे. डीआरपीपीएलच्या माध्यमातून हा पुनर्विकास मार्गी लावण्यात येणार आहे. पुनर्विकासाचा सविस्तर आराखडा तयार करण्यात आला आहे. पण अद्याप त्यास मान्यता नाही. रहिवाशांच्या पात्रता निश्चितेचे काम सध्या सुरू असून हे काम मार्च २०२५ मध्ये पूर्ण होणार आहे. असे असताना धारावी पुनर्विकासाचे भूमिपूजन करण्याचा घाट डीआरपीपीएलने, प्रामुख्याने अदानी समुहाने घातल्याचा आरोप धारावी बचाव आंदोलनाचे बाबुराव माने यांनी केला आहे. माटुंग्यातील आरपीएफ मैदानावर १२ सप्टेंबर रोजी सकाळी भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे समजते. सर्व धारावीकरांना धारावीतच घरे द्यावी, झोपडपट्टीवासियांना ५०० चौरस फुटांची घर द्यावी यासह अनेक मागण्याही अद्याप मान्य झालेल्या नाहीत. असे असताना भूमिपूजन कसे काय करणार, असा सवालही त्यांनी केला आहे. धारावी पुनर्विकासाच्या भूमिपूजनाला धारावीकरांचा विरोध असून हे भूमिपुजन म्हणजे धारावीकरांची फसवणूक असल्याचा आरोप धारावी बचाव आंदोलनाने केला आहे. त्यामुळे भूमिपूजनाचा हा सोहळा धारावीकर होऊ देणार नाहीत, हा सोहळा उधळून लावण्यात येईल, असा इशारा धारावी बचाव आंदोलनाने केला आहे. दरम्यान, या सोहळयाच्या निषेधार्थ बुधवारी सकाळी १० वाजता मांटुंगा लेबर कॅम्प येथे धारावी बचाव आंदोलनाकडून साखळी उपोषण करण्यात येणार आहे. तर गुरुवारी भूमिपूजन उधळून लावण्यात येईल, असा इशारा माने यांनी दिला. महत्त्वाचे म्हणजे दडपशाहीचा वापर करत भूमिपूजन झालेच, तर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही धारावी बचाव आंदोलनाकडून देण्यात आला आहे.

# शहरातील प्रमुख रस्ते सायंकाळी पाचनंतर वाहतुकीस बंद

## मध्यभागातील वाहतूक व्यवस्थेत आजपासून बदल

● पुणे, (प्रतिनिधी) :



देखावे पाहण्यासाठी होणारी गर्दी विचारात घेऊन बुधवारपासून (११ सप्टेंबर) शहराच्या मध्यभागातील प्रमुख रस्ते सायंकाळी पाचनंतर वाहतुकीस बंद करण्यात येणार आहेत. लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता वाहतुकीस बंद केले जाणार आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. घरगुती गणपती आणि गौरी विसर्जनानंतर सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणपतींच्या दर्शनासाठी आणि देखावे पाहण्यास गर्दी होते. गुरुवारपासून (११ सप्टेंबर) शहराच्या मध्यभागात गर्दी होण्याच्या शक्यता असल्याने वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. विसर्जन मिरवणुकीपर्यंत शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता अन्य सर्व वाहनांसाठी सायंकाळी पाचनंतर मध्यभागातील प्रमुख रस्ते बंद ठेवण्यात येणार आहेत. गर्दी ओसरेपर्यंत मुख्य रस्ते बंद असतील. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे. वाहतुकीस बंद असणारे रस्ते पुढीलप्रमाणे- लक्ष्मी रस्ता (हमजेखान चौक ते टिळक चौक), शिवाजी रस्ता (गाडगीळ पुतळा चौक ते देशभक्त केशवराव जेधे चौक, स्वारगेट), बाजीराव रस्ता (पूरम चौक ते अप्पा बळवंत चौक), टिळक रस्ता (मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ते हिराबाग चौक) वाहतुकीस बंद असणारे अंतर्गत रस्ते पुढीलप्रमाणे- सिंहगड गॅरेज (घोरपडे पेठ ते राष्ट्रभूषण चौक ते हिराबाग चौक), दिनकरराव जवळकर चौक ते पायगुडे चौक ते हिराबाग चौक, कै. अनंत बाळकृष्ण नाईक पथ ते टिळक रस्ता, सणस रस्ता (गोटीराम भैय्या चौक, मंडई ते गोविंद हलवाई चौक), पानघंटी चौक ते गंज पेठ पोलीस चौकी, गंज पेठ ते वीर लहुजी वस्ताद तालीम चौक, गायकसाब मशीद ते सेंटर स्ट्रीट पोलीस चौकी (लष्कर), कोहिनूर चौक ते बाबाजान चौक (लष्कर), जेधे प्रासाद रस्ता, सुभानशाह दर्गा, पार्श्वनाथ चौक, शास्त्री चौक ते सोन्या मारुती चौक, गुरुनानक पथ ते हमजेखान चौक (देवजीबाबा चौक, गणेश पेठ) शिवाजी रस्त्यावरील जिजामाता चौक ते मंडई, , मंडई ते शनिपार, शनिपार ते फुटका बुरूज, अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक या भागात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

# नार-पार योजनेच्या पाण्यासाठी जनहित याचिका, समन्यायी तत्वावर वाटपासाठी जलहक्क समिती आग्रही



● मनमाड, (प्रतिनिधी) :

नांदगाव तालुक्याचा समावेश नार-पार प्रकल्पात व्हावा, या मागणीसाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा निर्णय येथे घेण्यात आला. नार-पार-दमणगंगा प्रकल्पातून गिरणा खोऱ्यात आणल्या जाणाऱ्या पाण्याचे समन्यायी तत्वावर वाटप करण्याची मागणी करण्यात आली आहे. तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नार-पार-दमणगंगा खोऱ्यातील नियोजित जल प्रकल्पात नांदगावचा समावेश करून समन्यायी तत्वाने पाणी मिळण्यासाठी सर्वपक्षीयांनी राजकीय जोडे बाहेर काढून एकत्र लढा देण्याचा निर्धार येथे झालेल्या नार-पार जलहक्क समितीच्या बैठकीत करण्यात आला. येथील श्री लीला हॉटेलच्या सभागृहात नांदगाव तालुका नार-पार जलहक्क समितीच्यावतीने सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गणेश धात्रक यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी खासदार भास्कर भगरे, सामाजिक कार्यकर्ते अशोक परदेशी, माजी आमदार जगन्नाथ धात्रक, सजनतात्या कवडे आदी उपस्थित होते. नार-पार आणि दमणगंगा खोऱ्यातील पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी अडवून ते गिरणा खोऱ्यात आणण्यासाठी प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. यातून नांदगाव तालुक्यास पाणी मिळू शकते. याकडे सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले. तालुक्यात पाणी कसे आणता येईल, याचे वेगवेगळे पर्याय सुचवले गेले.

दिंडोरी तालुक्यातील उनंदा नदीवरील पुणेगाव धरणातून हे पाणी मांजरपाडा-एक, आणि इतर ११ वळण बंधाऱ्यापैकी पाच-सहामधून नैसर्गिक उताराने नांदगाव तालुक्याला देणे शक्य आहे. पुणेगाव -दरसवाडी- निंबाळा (चांदवड) कालवा-चारीद्वारे रायपूर-मनमाडमार्गे नांदगावमधील गावांना गुरुत्वाकर्षाने पाणी देता येईल.

### राज्यपालांना साकडे

■ खासदार भास्कर भगरे यांनीही या बैठकीत नांदगाव तालुक्यास न्याय मिळण्याचा मुद्दा मांडला. नांदगाव तालुक्याचा नार-पारच्या प्रकल्पात समावेश झाला पाहिजे. नांदगावकरांनी दिलेले निवेदन राज्यपालांना आपल्या पत्रासह दिले जाईल. त्यांच्याकडेही मागणी करणार असल्याचे भगरे यांनी सांगितले.

# नाशिकमध्ये फटाक्याच्या गोडाऊनला भीषण आग

● नाशिक, (प्रतिनिधी) :



येथील शिंदे गावात असलेल्या एका फटाक्याच्या गोडाऊनला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आग मोठ्या प्रमाणात असल्याने गोडाऊन मधून धुराचे लोट बाहेर येताना दिसत आहे. पोलीस आणि अग्निशमन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहे. यात चार कामगार जखमी झाले असून दोन कामगारांवर बिटको रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, नाशिकच्या शिंदे गावातील फटाक्याच्या गोडाऊनला एक ते दीड वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. गोडाऊनमध्ये असलेले फटके एकामागे एक फुटत असल्याने परिसरात मोठमोठे आवाज येत आहे. तर धुराचे लोट आकाशामध्ये पसरल्याचे पाहायला मिळत आहे.

आगीत चार कामगार जखमी

एक महिन्यावर दिवाळी असल्यानं गोडाऊनमध्ये फटाक्यांचा साठा जमा केला जात होता. गोदामात फटकांचा माल उतरविण्यासाठी ट्रक आलेला असताना आग लागल्याची माहिती मिळत आहे. आगीत चार कामगार जखमी झाले आहेत.

# कोल्हापूर विमानतळासाठी ६४ एकर जमिनीचे ऑक्टोबरपर्यंत संपादन




● कोल्हापूर, (प्रतिनिधी) :

कोल्हापूर विमानतळासाठी ६४ एकर जमीन ऑक्टोबरपर्यंत संपादित केली जाणार आहे, असे विमानतळाचे संचालक अनिल शिंदे यांनी स्पष्ट केले. कोल्हापूर विमानतळ सल्लागार समितीची यावर्षीची पहिली बैठक आज कोल्हापूर विमानतळ ठिकाणी समितीचे अध्यक्ष खासदार शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विमानतळाचे विस्तारीकरण, नवीन विमान सेवेबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आले. जिल्हाधिकारी अमोल येडगे, आमदार सतेज पाटील उपस्थित होते. कोल्हापूर विमानतळावरील धावपट्टी विस्तारीकरणाचे काम लवकर पूर्ण करून नवीन हवाई मार्गावर विमानसेवा सुरू करण्यासाठी नियोजन करावे, अशी सूचना शाहू महाराज यांनी केली. विमान प्रवाशांकडून रिक्षाचालक मोठ्या प्रमाणात भाड्याची दर आकारणी करतात, असा मुद्दा उपस्थित करून खासदार धैर्यशील माने यांनी विमानतळ प्रशासनाने हा प्रकार नियंत्रित करण्याची सूचना केली.

# केदारनाथ यात्रा मार्गावर भूस्खलन : ढिगाऱ्याखाली दबून एका भाविकाचा मृत्यू तर तिघांना बचावण्यात यश

● देहरादून, (प्रतिनिधी) :



केदारनाथ यात्रा मार्गावर भूस्खलन झाल्यानं भाविकांना मोठा फटका बसला आहे. या भूस्खलनात एक भाविक ढिगाऱ्याखाली दबून ठार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर इतर तीन भाविकांना बचावण्यात यश आलं. ही घटना सोनप्रयाग आणि गौरीकुंड या दरम्यान घडल्याची माहितीही सूत्रांनी दिली आहे. भूस्खलन होऊन एका भाविकाचा मृत्यू झाल्यानं मोठी हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. केदारनाथ मार्गावर सातत्यानं भूस्खलन होत आहे. याबाबत माहिती देताना उपनिरीक्षक आशिष दिमरी म्हणाले की, सोनप्रयाग-गौरीकुंड दरम्यान भूस्खलन होत आहे. त्यामुळे भाविकांना यात्रेला जाताना अडचणी येत आहेत. सोमवारी रात्री उशिरा केदारनाथ महामार्गावरील टेकडीवरुन मलबा खाली आला. त्यामुळे काही भाविक ढिगाऱ्याखाली गाडले गेले. याबाबतची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. केदारनाथ यात्रा मार्गावर भूस्खलनात एका भाविकाचा दबून मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांना आणि एसडीआरएफच्या पथकाला देण्यात आली. त्यानंतर एसआरडीएफच्या पथकानं तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी एसडीआरएफ पथकानं घटनास्थळी बचावकार्य सुरू केलं. यावेळी बचाव पथकानं तीन जखमींना ढिगाऱ्याखालून सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळवलं. मात्र यावेळी बचाव पथकाला ढिगाऱ्याखाली एक मृतदेह आढळून आला आहे. सर्व जखमींना प्राथमिक उपचारानंतर जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे.

केदारनाथ यात्रा मार्गावर सातत्यानं भूस्खलन होत असून त्यामुळे यात्रा मार्गात मोठा अडथळा येत आहे. बचाव कार्य सुरू असतानाही सतत मलबा पडत असल्यानं परिस्थिती आव्हानात्मक बनली आहे. मात्र SDRF टीम आपलं काम पूर्ण मेहनतीनं करत आहे. स्थानिक पोलीस आणि एनडीआरएफचं पथक घटनास्थळी तळ ठोकून आहेत. सर्वजण मिळून बचावकार्य करत आहेत. या भूस्खलनात अजून एक भाविक दबल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# अकोल्यातील श्री बाराभाई गणपतीची १३४ हून अधिक वर्षांची परंपरा

● अकोला, (प्रतिनिधी) :




लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला गणेशोत्सव विदर्भातील काही जुन्या गणेशोत्सव मंडळांनी आणि घराण्यांनी तेवढ्याच श्रद्धेने व भक्तिभावाने जोपासला. या मंडळ व घराण्यांच्या उत्सवाने आता शतके ओलांडली आहेत. मात्र, त्यांच्याकडील गणेशाची मूर्ती, त्यामागच्या कलाकारांचे हात आजही ती परंपरा जतन करून आहेत. अकोल्यातील जुने शहरात जयहिंद चौकातील १३४ हून अधिक वर्षांचा इतिहास असलेला मानाचा श्री बाराभाई गणपती विदर्भासह संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. या गणपतीची प्राचीन परंपरा नाथ कुटुंबीय व अकोलेकरांनी भक्तिभावाने जपली.

लोकमान्य टिळक यांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केल्यानंतर इंग्रजकालीन परिस्थतीतही अकोल्यातून कै.भगवाननाथ इंगळे यांनी श्री बाराभाई गणपतीसह शहरातील सात-आठ मंडळांची मिरवणूक काढली होती. तेव्हापासून अकोल्यातील गणपती विसर्जन मिरवणुकीत पहिल्या स्थानावर श्री बाराभाई गणपती पालखीत असतो. अकोल्यातील ही प्रथा १८९० च्या सुमारास सुरू झाली. या गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक दिंड्या असतात. श्री बाराभाई गणपतीची पालखी वाहणारे भोईराज सुद्धा पिढ्यांपिढ्या आपली सेवा गणेश चरणी अर्पण करीत आहेत. अनेक वर्षांपासून असलेल्या या गणपतीचे अकोलेकरांच्या मनात श्रद्धेचे भाव आहेत. श्री बाराभाई गणपतीला अनेक जण नवस बोलतात, साकडे घालतात. भक्तांच्या श्रद्धेला आणि विश्वासाला श्री बाराभाई गणपतीने कधीही तडा जाऊ दिला नाही, असे मोठ्या अभिमानाने नाथ कुटुंबीय सांगतात. अकोल्यातील श्री बाराभाई गणपती एकात्मतेचे प्रतीक आहे.

श्री बाराभाई गणपतीची मूर्ती गेल्या शंभर वर्षाहून अधिक वर्षांपासून एकच आहे. या अगोदर जुन्या पिढीतील मूर्तीकार ओंकारराव मोरे ठाकूर हे श्री बाराभाई गणपतीची मूर्ती तयार करीत होते.

### पेशवेकालीन बाराभाईशी निकट संबंध

“ श्री बाराभाई गणपती अकोला शहरातील गणेशोत्सवाचे एक आगळे-वेगळे आकर्षण. वऱ्हाडातील पारंपरिक गणपती म्हणून श्री बाराभाई गणपतीचा नावलौकिक आहे. श्री बाराभाई गणपतीची स्थापना नेमकी केव्हापासून झाली, याची कोणतीही नोंद नाही. या गणपतीचा पेशवेकालीन बाराभाईच्या कारस्थानाशी निकट संबंध असावा म्हणूनच याला बाराभाई हे नाव प्राप्त झाल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. प्राचीनकाळी श्री बाराभाई गणपतीची रुढी-परंपरेने स्थापना केल्या जात होती. मात्र, कालांतराने गणेशोत्सवातील सार्वजनिक उत्साह कमी झाला व ही परंपरा संपुष्टात येऊ नये म्हणून संस्थापक अध्यक्ष कै.भगवाननाथ इंगळे यांनी आपल्या घरी श्री बाराभाई गणपतीची स्थापना केली. तेव्हापासून श्री बाराभाई गणपती संपूर्णत: नाथ कुटुंबाचा आहे. श्री बाराभाई गणपतीची परंपरा नाथ कुटुंबियांनी गेल्या अनेक वर्षांपासून जोपासली. या गणपतीला मानाचे स्थान प्राप्त होऊन आज १३४ वर्ष लोटली आहेत.

# अर्धांग वायूचा झटका आल्यानं वृद्धाला टोपलीतून नेलं रुग्णालयात

● कोल्हापूर, (प्रतिनिधी) :





अर्धांगवायूचा झटका आलेल्या वृद्धाला रस्ता नसल्यानं रात्रभर घरीच ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. रात्रभर घरी ठेवल्यानंतर सकाळी या वृद्धाला बांबूच्या डोलीतून उपचारासाठी नेण्यात आलं. त्यामुळे या वृद्धाला उपचाारविना कुढत रात्र काढावी लागली. नवलू कस्तुरे असं या डोलीतून रुग्णालयात नेण्यात आलेल्या वृद्धाचं नाव आहे. ही घटना चंदगडमधील बुजवडे इथल्या धनगरवाड्यात घडली आहे. घनदाट जंगल आणि जंगली प्राण्यांचा वावर असून या वाड्यावर रस्ताचं नसल्याचा फटका नवलू कस्तुरे यांना बसला.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात देखील वृद्धाला उपचारासाठी टोपलीतून ( डालग्यातून ) नेण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. कोल्हापूरच्या चंदगड तालुक्यातील बुजवडे धनगर वाड्यावरील ही धक्कादायक परिस्थिती समोर आली आहे. बुजवडे धनगर वाड्यावरील नवलू कस्तुरे यांना रविवारी रात्री अर्धांग वायूचा झटका आला. मात्र धनगर वाड्यावरुन रुग्णालयाकडं जाण्यासाठी रस्ताच नसल्यानं त्यांना रात्रभर घरीच ठेवावं लागलं. अखेर पहाटे जंगलातून पाच किलोमीटरची पायपीट करुन ग्रामस्थांनी त्यांना रुग्णालयात दाखल केलं. वेळेत उपचार न मिळाल्यानं कस्तुरे यांना अत्यावश्य परिस्थितीत रुग्णालयात दाखल करावं लागलं. कोल्हापुरातील ग्रामीण भागात अजूनही अनेक धनगर वाड्या आहेत. मात्र तिथं मूलभूत सुविधा अद्यापही पोहोचलेल्या नाहीत. विशेषतः पावसाळयात या धनगर वाड्यावरील ग्रामस्थांना मरण यातना सहन कराव्या लागतात. धनगर वाड्यावर मतदार कमी आहेत. साक्षरता कमी असल्यानं लोकप्रतिनिधी आमच्याकडं दुर्लक्ष करत आहेत का? असा संतप्त सवाल या निमित्तानं नागरिकांनी विचारला.